# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // तहकुब विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४६** **दि. २९/०३/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२९/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| नेरकर सरिता अनंत | पाटील सचिन भिमराव | सोनवणे सुरेखा सुदाम |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे मयुर चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे मिना धुडकु | देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | पाटील विजय पुंडलिक | सोनार रंजना विजय |
| सोनवणे भारती कैलास | बारी शोभा दिनकर | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे मुकुंदा भागवत | शेख हसीनाबी शरिफ | शेख सैईदा युसुफ |
| तायडे ज्योती शरद | भिल पार्वताबाई दामु | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | पाटील उषा संतोष | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | बरडे नितीन मनोहर | **स्विकृत सदस्य** |
| चौधरी मंगला संजय | बेंडाळे उज्वला मोहन | कैलास नारायण सोनवणे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | राणे गायत्री इंद्रजित | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | जोशी अनंत हरिश्चंद्र | राजेंद्र नारायण मराठे |
| भोळे सिमा सुरेश | तायडे सुरेखा नितीन | महेश रतन चौधरी |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.अशोक करवंदे, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.गणेश चाटे, उपायुक्त श्री.अभिजीत बाविस्कर, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** नगरसचिव यांनी सभा कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य खडके विश्वनाथ सुरेश यांचा रजेचा अर्ज आलेला असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेला आहे. यानंतर आजच्या या वर्धापन दिनानिमित्त मा.महापौर महोदया यांना मी विनंती करतो की, त्यांनी या प्रसंगी निवेदन करावे ही विनंती.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावी.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मॅडम मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** दोन मिनीट थांबा माझे बोलणे होऊ द्या मग बोला, सगळयांना संधी दिली जाईल बोलण्याची.

**नगरसचिव :-** मा.महापौर यांच्या निर्देशानुसार, आजची जी महासभा ही अर्थसंकल्पीय आहे. तर मी सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, आजच्या या सभेमध्ये अर्थसंकल्पासंदर्भातच चर्चा व्हावी ही विनंती.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मॅडम मला दोन मिनीट बोलण्याची परवानगी मिळावी. प्रत्येक वेळी मी फोटो टाकलेले आहे. आयुक्त मॅडमांना फोन ही केलेला आहे. माझा फोन पण घेतला जात नाही. ज्यावेळेस फोन घेतला गेलेला आहे त्यावेळेसच साफसफाई होते. आता मी तेथे जाऊन आली, खुप सारी घान त्या पुतळयाच्या जवळ असते. नेहमीचाच हा विषय आहे. आणि अतिक्रमण विभागही त्याच्यावर काही उपाययोजना करीत नाही. हे नेहमी नेहमी महापुरुषांच्या पुतळयांजवळ हे होते.तर आमच्या सारखे ज्या वेळेस कामे घेऊन येतात ते कसे होणार. त्यामुळे आज होणाऱ्या महासभेचा मी सभात्याग करीत आहे.

(सन्मा.सदस्या श्रीमती सरिता नेरकर सभा त्याग करुन सभागृहाच्या बाहेर गेले.)

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** दखल घ्यायला पाहिजे ना. असे नाही चालणार ना. विनंती करायला पाहिजे असे जर कोणी सदस्य जर कधी सभेचा सभा त्याग करेल अश्या पध्दतीने तर चुकत आहे ना आपले, म.न.पा. प्रशासनाचे चुकत आहे ना. म्हणजे ते एकदम नाराज होऊन गेले. दखल घ्या बोलवा त्यांना.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्या सरितााताई नेरकर यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. आणि सन्मा.सदस्या सरितााताई नेरकर यांना सन्मानपुर्वक सभागृहात बोलविण्यात यावे.

**नगरसचिव :-** संदीप.

(सन्मा.सदस्या श्रीमती सरिता नेरकर सन्मानपुर्वक सभागृहात परत आले.)

**मा.महापौर :-** ताई आपण बसुन घ्या. सभा त्याग करण्याची काही आवश्यकता नाही. आपल्या ज्या भावना आहे त्या खरंच योग्य आहे. आणि प्रशासनाने त्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.

**श्रीमती सरिता नेरकर :-** ताई फोटो पहा तुम्ही, माझ्याकडे फोटो आहे. मी रोज तेथे जाते. रोज फोटो टाकते. स्वत: मॅडमांना पण टाकलेले आहे. आता जरी तुम्ही तेथे गेले ना. बघुन घ्या तुम्ही तिथले फोटो. ज्यांच्यामुळे आपण ईथपर्यंत आलो त्यांची ही दुर्दशा आहे. वाईट वाटते.नाही तर आपण येथे आलोच नसतो. ज्या व्यक्तीमुळे आपण इथपर्यंत पोहचलो आहे. ज्या महापुरुषामुळे आपण या खुर्चीवर बसलो आहे. म्हणुन आज आपण एकमेकांशी बोलत आहोत.

**मा.महापौर :-** बरोबर, बरोबर आहे ताई.

**श्रीमती सरिता नेरकर :-** या विषयाबाबत मी निवडुन आली त्या दिवसापासुन हा विषय चाललेला आहे. पण तेथे काहीही कार्यवाही होत नाही. काहीच नाही.

**मा.महापौर :-** ताई आपण बसुन घ्या. काही सुचना आहे त्या द्यायच्या आहे.

**मा.आयुक्त :-** उदय पाटील, आपली एक डेडीकेटेड टिम आपल्या गाडयांवर लावलेली आहे. तर तेथे संध्याकाळी स्वच्छता होईल याची दक्षता घ्या. कारण दिवसभराचा कचरा ते रात्री लावुन जातात तर अरली मॉर्निंग होऊन जाते. जेथे जेथे यांचे फोटो आहेत. महापुरुषांचे फोटो आहेत. तेथे डेडीकेटेड टिम असावी आणि त्यांची स्वच्छता व्हावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आणि पुतळयाजवळ त्यांना गाडया लावायला परवानगी देऊ नका.

**मा.आयुक्त :-** आणि याच्यापुढे कोणी तेथे गाडी लावलेली दिसली ना तर सरळ दंडाची कार्यवाही करा. त्या शिवाय परिस्थिती सुधरणार नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** वॉरनिंग द्यायला लावा.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मॅडम तो पुर्ण बांधलेला असतो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कार्यवाही करा त्यांच्यावर.

**नगरसचिव -विषय क्र.१ :-** मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/७०९/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे अवलोकन करता.एकंदरीत आपण जळगांव शहराच्या विकासाच्या संदर्भात सातत्याने बघतो की, अनेक अडचणी आपल्या डोळयांसमोर उभ्या राहतात. या सर्व गोष्टींचे अवलोकन केले असता एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की, अर्थसंकल्पाला अर्थच उरलेला नाही. कारण अर्थ वसुल करण्याच्या संदर्भात कोणी प्रयत्नच करत नाही. आणि अर्थ वसुल नाही केले तर आपण येथे केलेल्या चर्चेलाही काही अर्थ ऊरत नाही. कारण एकंदरीत वसुलीचे प्रमाण बघितले तर, एक साधारणता २४ तारखेपर्यंतच्या अंदाजाचे आकडे प्रशासनाकडुन घेण्यात आले.आणि त्याचा अभ्यास केले असता, साधारणता आज ही वसुली जी आहे आपली ती ४८% च्या जवळपासच आहे. आता ४८% च्या जवळपास जर वसुली असेल. तर आपण अर्थसंकल्पात ज्या ज्या काही योजना योजल्या असतील.जे जे काही विकास कामे करण्याचे संदर्भातले अंदाज आपण बांधलेले असतील. ते सुध्दा ४८% पर्यंतच होतील. १००% वसुली होणार नाही तर १००% अर्थसंकल्पात केलेल्या आश्वासनांची पुर्तता होणार नाही. मग मला सांगा की, अश्या पध्दतीने आपण अर्थसंकल्प सादर करायचे त्याच्यावरती पोटतिळकीने सर्व सभासदांनी चर्चा करायची. आणि वर्षात त्याचा घोषवारा बघितले परिस्थिती बघितली तर वेदनादायी अशी परिस्थिती, आज आपण बघतो, अनेक वेळा चर्चेमध्ये प्रत्येक सदस्य म्हणतो. निदान निधीचे कामे नाही मिळत असतील तर कमीतकमी मनपा फंडातुन आपले कामे मंजुर करा. परंतु आयुक्त महोदया आपण मनपा फंडात कामे मंजुर करण्याचे संदर्भात जी हतबलता व्यक्त करतात त्याचे मुख्य कारण हेच की, मनपा फंडात पैसाच येत नाही. आणि आपला हक्काचा असलेला पैसा आपण वसुलच करु शकलो नाही. तर मला सांगा विकास साध्य कसा होईल. आणि जर कधी विकास साध्य होत नसेल. तर कालांतराने हे शहरे भकास होत जातील. आणि शहर भकास होत जातील. येथील व्यवसाय दुसरीकडे जाईल. इथला तरुण दुसरीकडे जाईल. म्हणजे सगळया गोष्टींचा अर्थ काढल्यावरती मोठया प्रमाणावरती आपल्या महानगरपालिकेच्या नियोजनाच्या अनुषंगाने या शहराच्या विकासाच्या कामांवरती व शहराच्या आर्थिक कामांवरती मोठा परिणाम जाणवतो. आपण बघितले, २०२२-२३ चा रफली एक इस्टीमेट काढले. एक अंदाज घेतला तर कर्मचारी वर्गाच्या वेतनावरती खर्च झाले आपले ७५ कोटी २४ लक्ष. रोजंदारी कर्मचाऱ्यांवरती ४२ लक्ष खर्च झाले,निवृत्तीवेतनसाठी आपल्याला ३८ कोटी १५ लक्ष रुपये अदा करावे लागले. शिक्षण मंडळाचा मनपा हिस्सा ५०% चा तो जवळपास १६ कोटी ३८ लक्ष म्हणजे हे कमीटेड एक्सपेंडीचर याच्यावरती खर्च झाले १३० कोटी १९ लक्ष, हे कमीटेड आहे. म्हणजे हा खर्च केला आणि याच्यामधुन शहराच्या विकासामध्ये भर पडली.असे काहीच नाही. आणि विकास कामांवर जो खर्च झाला तर तो आकडेवारी बघुन थोडे मला ही आश्चर्य वाटले की, ही काय परिस्थिती आहे. नविन बगिच्यांवरती आपण १.५ कोटीची तरतुद केली होती खर्च मात्र झाले शुन्य, उद्याने व्यवस्था व दुरुस्तीसाठी १५ लक्ष तरतुद केली होती त्याच्यावरती खर्च झाले १७ लक्ष, २ लक्ष जास्त झाले. नविन इमारतींवर १ कोटीची तरतुद केली होती. ३ लक्ष रुपये खर्च झाले, इमारत व्यवस्था व दुरुस्तीसाठी १ कोटीची तरतुद केली होती.४२ लक्ष खर्च झाले, नविन रस्त्यांवर आपण १० कोटीची तरतुद केली होती. आणि खर्च झाले १ कोटी २१ लक्ष, म्हणजे मी माहिती घेतली तो पर्यंत, काही वाढ झाली असेल तर थोडी फार परंतु १० कोटीची तरतुद नविन रस्त्यांसाठी केली असता,फक्त १ कोटी २१ लक्ष रुपये खर्च झाले, रस्ते व्यवस्था व दुरुस्तीसाठी १० कोटीची तरतुद आपण केली होती. खर्च झाले २ कोटी २१ लक्ष, नविन गटारी वर आपण ५ कोटीची तरतुद केली होती.खर्च झाले १ कोटी १३ लक्ष, गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठी ३ कोटीची तरतुद केली होती. खर्च झाले फक्त २८ लक्ष रुपये. असे साधारणता टोटल खर्च हा जवळपास ५.५ कोटीच्या जवळपास खर्च झालेला आहे. विकास कामांवरती, म्हणजे विकास कामांवरती ५.५ कोटी खर्च आणि निवृत्तीवेतन, वेतन आणि या सगळयांवरती १३० कोटी खर्च, म्हणजे आपण थोडक्यात ही महानगरपालिका फक्त कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे देणे, यासंदर्भातच महापालिकेचे कर्तव्य आहे का ? ऐवढेच काम आपल्याकडे आहे. आपण येथे यायचे १२ महिने विकास कामांवर चर्चा करायची. अर्थसंकल्पामध्ये आपण मोठमोठया घोषणा करायच्या, नागरीकांना आमिष दाखवायचे, प्रलोभने दाखवायचे, परंतु ही प्रगती सगळी चर्चा धुळफेकीची ठरते का तर १३०

कोटी रुपये फिक्स एक्सपेंडीचरवर खर्च होत आहे आणि विकास कामांवरती ५-६ कोटी रुपये खर्च होत असतील, शासकीय निधींवरतीच आपण आपली मर्यादा का ठेवावी. आज मला सांगा आपल्याला मागच्या वर्षामध्ये मा.ना.गुलाबभाऊंनी DPDC मधुन ५०-६० कोटी रुपयांची तरतुद करुन दिली, आपण त्यांचे आभारी आहोत. समजा तो ५०-६० कोटीचा विकास निधी कधी नाही मिळाला असता, राज्य शासनाकडुन आपल्याला विकास निधी मिळाला, या निधीवर आपण अवलंबुन राहणार का ?आपण आपले स्वय: उत्पन्नाचे स्त्रोत जे आहे. जे हक्काचे आपले स्त्रोत आहे. म्हणजे आपण पैसेवाले असुन सुध्दा आपली परिस्थिती भिकारीपेक्षा वाईट आहे. म्हणजे सातत्याने आपल्याला राज्य शासनासमोर हात पसरावे लागतात.आपले हक्काचे उत्पन्नाचे स्त्रोत घरपट्टीच्या वसुलीच्या संदर्भातुन जर कधी बघितले तर ही ५०%ची वसुली, मार्केटच्या संदर्भातला विषय जर बघितला तर तशीच परिस्थिती आहे. म्हणजे मला कधी कधी शासनाचे ही आश्चर्य वाटते की, राज्य शासनाने दि.०६/०४/२०२२ म्हणजे जवळपास एक वर्ष होईल आता. एक वर्षापुर्वी सगळया व्यापारी संकुलांच्या वसुलीच्या अनुषंगाने स्थगिती दिली, शासनाने धोरण ठरवायचे. शासनानेच नियमावली तयार करायची, आणि पुन्हा कुठेतरी लोकप्रतिनिधी जातात. ज्या लोकप्रतिनिधींना या शहराशी काही घेणे देणे नाही. असे लोकप्रतिनिधी शिष्टमंडळ घेऊन जातात तेथे. आणि राज्य शासन स्थगिती करते.आज मला सांगा २००-२५० कोटी रुपयांचा आपल्या हक्काचा उत्पन्न आहे. २००-२५० कोटीच्या उत्पन्नापासुन आपल्याला वंचित ठेवले जाते. एक वर्षापासुन स्थगिती दिलेली आहे. राज्य शासनाला त्याच्या बाबत जे काही निर्णय घ्यायचे असेल, बाजारभाव मुल्याचे ८% हस्तांतरण शुल्क हा नियम सुध्दा राज्य शासनानेच तयार केलेला आहे. त्याचे नोटीफिकेशन सुध्दा राज्य शासनानेच काढले, त्याला स्थगितीपण राज्य शासनानेच दिली, आमचे म्हणणे आहे. ८%, ६%, ५%, ४% फुकटात द्यायचे असेल तर शासनाने धोरण ठरवावे की, महानगरपालिकेच्या मालकीचे गाळे सगळे फुकटात द्यावे लागणार. महानगरपालिकेला या बदल्यातला निधी राज्य शासन कॉमप्नसेट करुन देईल. पण कुठेतरी धोरण ठरवायला पाहिजे ना. म्हणजे राज्य शासन अश्या पध्दतीने वागत असेल, तर मला वाटत नाही की, या महानगरपालिकेचा विकास होणार कसा. आणि ही महानगरपालिका नागरिकांना सुखसोई देऊ कशी शकेल. आपण एक एक वर्ष महत्वांच्या विषयांवरती, जर कधी राज्य शासनाकडुन निर्णय होत नसतील, वास्तविक बघितले तर स्थानिक लोकप्रतिनिधींची ही जबाबदारी आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी तेथे जाऊन पाठपुरावा करायला पाहिजे. ज्या पध्दतीने स्थगिती आणण्याच्या संदर्भात आपण पाठपुरावा करतो. त्या गाळेधारकांना न्याय देण्याच्या संदर्भात आपण श्रेय घेण्याचा प्रयत्न करतो.तर कमीत कमी या महानगरपालिकेचा सुध्दा विचार लोकप्रतिनिधींनी करायला पाहिजे. काय तडजोड करायची असेल शासनासोबत त्या व्यापाऱ्यांसोबत, परंतु विषयाचा मार्गी लागणे हे गरजेचे आहे. अश्या पध्दतीने कोटयावधी रुपयांचे, तसे बघितले तर तो शासन निर्णय जो आहे तो वेगतशी आहे तसा, ती स्थगिती जी दिलेली आहे ती एका अर्थाने शब्दछल केलेला आहे. त्याच्यातुन आजही तुमची गाळयांची असलेली वसुली ही कायदेशीर रित्या करु शकतात. कारण स्थगिती जी दिलेली आहे, जो नियम शासनाने केलेला होता. त्या नियमाच्या दि.१३/०९/२०१९ च्या अधीसुचनेत प्रसिध्द नियमावलीतील नियम-३ /२ मालमत्तेच्या मुल्यांकनाचे ८% रक्कम किंवा बाजार भावाचे निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल तेवढे वार्षिक भाडे समितीमार्फत निश्चित करावे.असे आहे. या नियमाची अंमलबजावणी पुढील आदेश होईपावेतो स्थगिती देण्यात येत आहे. म्हणजे नियम-३/२ ला स्थगिती दिलेली आहे. परंतु यापुर्वी जो निर्णय घेतलेला होता. त्या निर्णयामधील २०१९ चा शासन निर्णय जो आहे. त्याच्यामध्ये नियम क्र.४ नियमावली पुर्वी भाडेपट्टेची मदुत संपलेल्या तथापी नोंदकरण न झालेल्या वैद भाडेपट्टयाचे नुतनीकरण हस्तांतरण हे अधिनियमातील तरतुदीनुसार करण्यात येईल.तथापी ज्या प्रकरणात भाडेपट्टयाची रक्कम संबंधीतांनी भरलेली नसेल, अश्या प्रकरणात, महाराष्ट्र मुद्रांक मालमत्तेचे वास्तव बाजारमुल्य निरधारीत करणे नियम १९९५ नुसार बाजारमुल्याच्या अनुषंगाने मालमत्तेच्या होणाऱ्या मुल्यांकनाच्या ८% रक्कम अधिक अधिनियमातील तरतुदीनुसार दरमहा २% व्याजासह आकारणी करण्यात यावी. मा.आयुक्त महोदया, हाच शासन निर्णय या शासन निर्णयाच्या २/३ ला स्थगिती देण्यात आलेली आहे. परंतु कलम ४ जी आहे. त्याच्या अनुषंगाने तुमच्या वसुलीला कोणत्याही प्रकारच्या बाधा येत नाही. आपले म्हणणे असे नाही की, व्यापाऱ्यांच्या विरोधात आपले धोरण आहे किंवा व्यापाऱ्यांच्या विरोधात आपली भुमिका आहे. उद्या असे आहे की, आपली हीच

चर्चा व्यापाऱ्यांना जाऊन सांगितील की, नितीन लढ्ढा तुमच्या विरोधात बोलतो,तुमचे गाळे जप्त करण्याच्या संदर्भातील भुमिका घेतो, परंतु शेवटी राज्य शासनाला याच्या बाबतीत जे काही व्यापाऱ्यांच्या बाबतीतले योग्य धोरण ठरवायचे असेल, तर त्यांनी ठरवायला पाहिजे. आणि या सगळया गोष्टी जेव्हा आपण म्हणतो की, बाळ रडत नाही तोपर्यंत आई ही दुध पाजत नाही. तुम्हाला मिळालेल्या कलम ४ च्या अनुषंगाने तुम्ही याच्या संदर्भातली कार्यवाही सुरु करणार नाही तोपर्यंत राज्य शासनाला ही जाग येणार नाही. एक वर्ष गेले पून्हा आता ४-६ महिन्यानंतर निवडणुका लागतील, पुन्हा हे सगळे विषय जे आहे, हे ठंडे बसतात जातील. पंरतु मला सांगा महानगरपालिकेने आपल्या हक्काच्या उत्पन्नावरती अश्या पध्दतीने पाणी सोडुन द्यायचे का ? ही मुळात जी आहे बाब अत्यंत गंभिर आहे. या संदर्भात प्रशासनाने विचार करायला पाहिजे. घरपट्टीच्या संदर्भातले बिले जे आपण प्रस्तावीत केलेले आहे. अर्थसंकल्प २०२३-२४ ला मिळकत कराची मागणी जी आहे. ती साधारणता १११ कोटी काही तरी दर्शविण्यात आलेली आहे. आता १११ कोटी रुपयांची मागणी जी आहे ती आपण दर्शविलेली आहे. आपण सन २०२२-२३ चे यश बघितले तर २०२२-२३ ची एकुण मागणी होती २०३,८५,८०,९३७/- रुपये. साधारणता दि.२४/०३/२०२३ पर्यंत एकुण वसुली झाली ९७,९६,४१,००७/- रुपये या वसुलीचे प्रमाण बघितले तर २४ तारखेपर्यंत तर हे जवळपास ४८% प्रमाण आहे. दि.२४/०३/२०२३ पासुन दि.३१/०३/२०२३ पर्यंत अजुन ६ दिवसांमध्ये १-२ टक्के वाढ होईल आपण असे गृहीत धरले, तरी एकंदरीत मागणी ही ५०% वसुली आहे. आता एकुण मागणीच्या ५०% वसुली आहे. २०० कोटीची तुमची मागच्या वर्षाची मागणी डिमांड होते. २०० कोटीच्या अगेन्स्टमध्ये १०० कोटी आपण वसुल केले. म्हणजे मागच्या वर्षाचे १०० कोटी जे आहे. ती ही आपली थकबाकी म्हणुन राहील आणि चालु वर्षाची डिमांड जी आहे साधारणता ८२-८३ कोटीची आपली डिमांड आहे. म्हणजे १८२-१८३ चे डिमांड ही अर्थसंकल्पामध्ये रिफलेक्ट व्हायला पाहिजे. जी काही दाखवलेली आहे आपण १११ कोटी, म्हणजे ७० कोटीची डिमांड ही, म्हणजे मुळात काय होते. आपल्याच डिमांडला आपणच कमी पकडतो, का तर आपली एक मानसिकता ठरवुन घेतली आहे की, ५०% च्या वर वसुलीच होत नाही. आणि ५०% च्या वर वसुलीच होत नसल्या कारणाने आपण १००% जी मागणी आपली आहे. ही १००% मागणी दर्शविण्याचा कधी प्रयत्नच करत नाही. म्हणजे आपण ती एक मानसिकता तयार करुन घतलेली आहे की, ऐवढीच आपली वसुली होणार आहे. म्हणजे त्याच्या तुलनेने ऐवढी दर्शवा.याला तसे बघितले तर काही अर्थ नाही. ॲक्चुअल आपली जी डिमांड आहे. ती डिमांड तशी त्या तशी रिफलेक्ट होणे अपेक्षीत आहे. त्याच पध्दतीने खुल्या भुखंडाच्या संदर्भातही ३४ कोटी रुपयांची डिमांड आहे. साधारणता ४ कोटीच्या जवळपास मागच्या वर्षात वसुल झालेले आहे. आपण मागच्या बजेटमध्ये याचा विचार केला होता की, खुला भुखंड विभाग हा प्रत्येक प्रभाग समिती अंतर्गत दिल्यानंतर कमीत कमी त्याच्यामध्ये ज्या डिमांडस आपल्याला वाटत असतील की, ज्या निर्लेखित करण्यासारख्या असतील, ज्या खुला भुखंडावर इमारत बांधली गेली असेल, ज्याच्यावरती मिळकत कराची आकारणी झाली असेल, तर डबल डिमांड नको की, मिळकत करामध्ये ही डिमांड दिसत आहे आणि खुला भुंखडामध्ये ही डिमांड दिसत आहे. परंतु ॲक्चुअल आज ३० कोटी दिसत आहे. परंतु ती डिमांड किती आहे. त्याच्या संदर्भातली ही स्पष्टता गेल्या अनेक वर्षापासुन प्रत्येक अर्थसंकल्पावरती या विषयावरती चर्चा होते. पंरतु खुला भुखंड कर विभाग जो आहे. त्याचे संदर्भात नेमकी मागणी किती आहे. त्यात ट्रान्परन्सी दिसत नाही. आपल्या वसुलीचे उत्पन्न वाढावे आणि उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीकोणातुन आपण वर्षाच्या सुरुवातीलाच एप्रिल महिन्यामध्ये रिबेट देतो की, लोकांना काही तरी त्याचा आकर्षण राहील.आणि आपल्या वसुली मध्ये काही तरी वाढ होईल. पंरतु तो एक प्रयत्न झाला.त्याच्यानंतर प्रशासनाकडुन संपुर्ण वर्षभरामध्ये वसुली करण्यासंदर्भात कुठलेच यशस्वी प्रयत्न होतांना दिसुन येत नाही. आणि त्याचाच परिणाम म्हणुन वसुलीचे उद्दिष्ट ५०% च्या वर पोहचत नाही. आणि अश्या पध्दतीने आपण त्याच्यावरती शास्ती लावतो. व्याजाची आकारणी करतो. आणि सगळयात शेवटी पुन्हा आपण आपल्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी म्हणुन पुन्हा त्यांना शास्तीमध्ये माफी देतो. आता शास्तीच्या माफी मध्ये रक्कम किती वसुल केली आपण,

**श्री.कैलास सोनवणे :-** मला वाटते, ६०% च्या वर केली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रक्कम आपला जर ५-६ दिवसांमध्ये बघितली तर ५ कोटी ९८ लक्ष माफ केली, आणि थोडया वेळेपुर्वी चाटे साहेबांशी चर्चा केली, तर तो आकडा ९ कोटी रुपये पर्यंतचा आहे. म्हणजे ९ कोटी रुपयाची शास्ती आपण माफ करतो. म्हणजे काय झाले ९ कोटीचे उत्पन्नावर आपण पाणी सोडतो आहे. म्हणजे एकीकडे नगरसेवक ५-१०-२०-२५ लाखाच्या निधीसाठी या सभागृहात भांडतो, आयुक्तांच्या दालनात चपला घासतो. आपण त्यांना मनपा निधीतुन काम मंजुर करुन देत नाही का तर आपल्याकडे मनपा निधी नाही. आणि १०-१० कोटीच्या शास्तीची माफी दिली जाते, ही परिस्थिती का निर्माण होते. वेळेवरती जर कधी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी वसुलीच्या संदर्भात तकादा ठेवला, वेळेवरती वसुली झाली पाहिजे तशी, सगळयांची मानसिकता असते,परंतु काय होतो अश्या पध्दतीने,शास्तीमध्ये माफी देण्याच्या संदर्भात ही भुमिका आपण स्विकारत गेलो, कालंतराने काय होईल याचे दुर्देवी परिणाम महानगरपालिकेच्या उत्पन्नावरती दिसेल, कारण लोकांची एक मानसिकता होऊन जाते की, मी नाही पैसे भरले, काय होईल व्याज लागेल, व्याज लागल्यानंतर काय होईल. वर्ष अखेरला महानगरपालिका शास्ती माफीची योजना आणेल, म्हणजे याच्याने काय होत की, जो प्रामाणिक करदाता आहे, जो एप्रिलच्या सुरुवातीला इमानदारीने पैसे भरतो, अश्या प्रामाणिक करदात्याच्या मानसिकतेवरती नाकारत्मक परिणाम होतो. त्याची मानसिकता उद्या जाऊन पुन्हा अशीच होईल.मी कशाला प्रामाणिकपणे कर भरायचे.  जर कधी प्रत्येकाला शास्तीची माफी मिळते, मग मी आज भरले काय आणि वर्ष अखेरला भरले काय, आणि २ वर्षाने भरले काय ?तर त्याचा आपल्या वसुलीवर कायमस्वरुपी परिणाम होईल. तर याबाबतीत ही मला वाटते गांभिर्याने यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. बाकी महत्वाचे जेवढया सुचना मला वाटतात, बाकी बजेट मध्ये कमी करणे किंवा जास्त करणे हे फक्त मनाला एक समाधान होईल, कुठल्या याच्यावर कितीही तरतुद ठेवली आणि कितीही कमी केली, किती वाढवायची हा फक्त एक उपचारीकतेचा खेळ आहे. या खेळाला काहीही अर्थ नाही. त्याचे उदाहरण द्यायचे म्हटले तर पहा,सुरुवातीलो आपले सभापती होते जितेंद्रभाऊ मराठे, पहिले सभापती आपल्या महापालिकेचे, अश्याच पध्दतीने आपण अर्थसंकल्पामध्ये बऱ्याच वेळी सुधारणा करतो, आणि सुधारणा करुन म्हणतो की, याच्यामध्ये कमी होईल, याच्यामध्ये तरतुद जास्त करणे गरजेचे आहे. सन २०१९-२० मध्ये सभापती आपले जितेंद्रभाऊ मराठे होते, अर्थसंकल्पीय खर्चाची बाजु त्यांनी सार्वजनिक उद्याने देखभाल दुरुस्तीसाठी त्यावेळेला होते. प्रशासनाने १ लक्ष रुपयाची तरतुद ठेवली होती. आणि त्यावेळेला जितेंद्रभाऊंना वाटले की, १ लक्ष रुपयाची तरतुद जी आहे सार्वजनिक उद्याने देखभाल व दुरुस्तीसाठी ती अत्यंत तोकडी आहे. आणि त्यांनी ती १ लक्षाची तरतुद ५ कोटी रुपये पर्यंत वाढवली. १ लक्षाची तरतुद ५ कोटीवर नेली. आणि त्या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक उद्याने व्यवस्था व दुरुस्तीसाठी खर्च झाला रु.७४,३५६/-

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे प्रशासनाचे म्हणणे बरोबर होते. मा.महापौर एक मिनीट बोलु द्या, काय होते सभापती म्हणुन जेव्हा बसतो ना सदस्य त्यांना बाकीचे सदस्य मध्येच सांगतात की, हे पुरणार नाही, हे आमच्या वार्डात घ्या, तर अश्या प्रकारे ती वाढविली जाते. त्यात सभापतींचा काही दोष नाही, तुम्ही खर्च केले नाही तुमच्या वार्डात तुमचा दोष आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझे म्हणणेच ते आहे आप्पा साहेब की, आपण तरतुदी करतो, तरतुदी का करतो की, आपले जे व्हिजन असते, आपले ध्येय घेऊन चालतो आपण की, माझ्या कार्यकाळामध्ये मला दोन चार उद्यान सुशोभिकरण करायचे आहे त्यांच्या देखभाल दुरुस्तीवर खर्च करायचे आहे. भंग अवस्तेत झालेले उद्याने असतील त्यांची दुरुस्ती करायची आहे. म्हणुन तरतुद करतो आपण, परंतु तरतुद केल्यानंतर खऱ्या अर्थाने त्या तरतुदीचा उपयोग होत नसेल तर मग मला सांगा की, काय अर्थ, निव्वळ कागदावरतीच तो ठरतो, त्याच पध्दतीने स्मशानभुमी व्यवस्था व दुरुस्तीसाठी त्यावेळेला ५० हजाराची प्रशासनाने तरतुद केलेली होती. ती ५० हजार वरुन १ कोटी केली. खर्च किती झाला शुन्य. प्रत्येक प्रभाग समितीसाठी, प्रभाग समिती क्र.१ ते ४ साठी १० लक्ष रुपयांची तरतुद होती, ती ५० लक्षाची तरतुद प्रत्येक प्रभाग समितीला करण्यात आली. खर्च झाला शुन्य. गटार व्यवस्था व दुरुस्तीचा एकत्र निधी ५० हजार वरुन १ कोटी करण्यात आला, खर्च झाला शुन्य. क्रिडा व्यायाम शाळांकरीता जी तरतुद होती ती शुन्य तरतुद होती प्रशासनाने, ती तरतुद केली १ कोटी रुपये. खर्च झाला शुन्य.  क्रिडास्पर्धा, महापौर चषकसाठी तरतुद

३० हजार होती, ३० हजार वरुन २५ लक्ष केली. क्रिडास्पर्धांसाठी खर्च झाला ३ लाख रुपये. अश्या पध्दतीने नविन संडाशी व मुत्र्यांसाठी जी तरतुद होती ती १ कोटीवरुन ३ कोटी केली. खर्च झाले १२ लक्ष रुपये. नविन स्मशानभुमी उभारण्यासाठी ५० लक्षची तरतुद होती. ती २ कोटी केली. खर्च झाले शुन्य. म्हणजे अश्या पध्दतीने दिक्षाभुमी बांधण्यासाठी २ कोटीची तरतुद केली होती खर्च झाले शुन्य. जळगांव शहरात चौपदरी रस्त्यासाठी नविन लाईट बसविणे कामी नव्याने लेखाशिर्षामधुन रक्कम रु.६० कोटी तरतुद करण्यात येत आहे. खर्च झाला शुन्य रु.

**श्री.कैलास सोनवणे :-** लाईटांवर खर्च झाले ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शुन्य झाले, स्मशानभुमी, दफनभुमी साहित्य, लाकुड पुरविण्याकामी १ कोटीची तरतुद केली, खर्च झाले शुन्य. नागरीकांचा अपघात विमा काढण्यासाठी १ लक्ष रुपयांची तरतुद होती. त्या १ लक्ष वरुन आपण १ कोटी केली. खर्च झाले शुन्य. आणि काय होत. आपण अर्थसंकल्प मांडतो. आणि अश्या पध्दतीने तरतुदी करतो. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात बाबी आणि ठळक बातम्यांमध्ये. या सगळया बाबी जनतेसमोर जातात की, सामान्य नागरीकाचा विमा काढण्यासाठी जळगांव महानगरपालिकेने १ कोटी रुपयाची तरतुद केलेली आहे. त्यांना त्यावेळी असे वाटले की, चला महानगरपालिका आमच्या रस्त्यांची नाही, गटारींची नाही पण आमच्या जिवाची तरी काळजी घेत आहे. परंतु त्यावर अंमलबजावणी होत नाही. म्हणजे याला दोघीही जबाबदार आहे. प्रशासनही जबाबदार आहे आणि त्यावेळेचे पदाधिकारीही जबाबदार आहे. कारण काय आप्पा शेवटी सत्ताधारी कोणी असो. मी असो, तुम्ही असो कोणीही असो. ज्या वेळी आपण निर्णय घेतो. त्या गोष्टींची जबाबदारी दोघांवर आहे. प्रशासनावरही आहे आणि जे लोकनियुक्त पदाधिकारी असतील, सदस्य असतील, ही सामुहिक जबाबदारी आहे. वसुल करण्याच्या संदर्भात आपण फक्त अर्थसंकल्पाच्या दृष्टीने येथे चर्चा करतो. त्या दृष्टीने फक्त पाहतो आपण की, वसुलीचे प्रमाण किती तर ४८% ही बघितले तर १२ महिने नगरपालिका असतांना आप्पा तुम्हाला कल्पना आहे. दर आठवडयाला मिटींग व्हायची आणि दर आठवडयला रिव्हीवु घेतला जायचा. वसुलीचे टार्गेट त्या विभागातील कर्मचाऱ्यांना दिला जायचा. आणि दर आठवडयाला मिटींग घेऊन त्यांना दिलेले टार्गेट अचीव्ह झाले की नाही. पंरतु आता तसे होतांना दिसुन येत नाही. आणि याचा सगळयांवर परिणाम काय होतो की, आपण नागरीकांना आश्वासन देतो. त्या आश्वासनांवरती त्याचा सगळा परिणाम दिसतो. शुचितातार्इ नंतर सभापती होत्या. सन २०२०-२१ ला. त्यांचे ही मनोगत आपल्या हातात आहे. असी सगळी परिस्थिती आहे. त्या परिस्थितीमध्ये काही खुप मोठे बदल नाही. पंरतु एक उदाहरण सांगतो. शुचितातार्इंचे मनोगत वाचत आलो. नविन इमारती फायर स्टेशन बांधणे, वार्ड ऑफिस बांधणे व इतर प्रशासकीय तरतुद १५ लाख रुपये आहे. जमा बाजु स्थायी समितीने प्रस्तावीत केलेली वाढ, साध्य करण्यासाठी प्रभाग समिती कार्यालयांचे रुपांतर, आपण मिनी मनपात करणे आवश्यक आहे. मनपातील केंद्रीकृत खुला भुखंडाचे प्रभाग समिती निहाय विभागणी करण्यात येवुन मिनी मनपा करणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, स्वच्छता विभाग, लाईट विभाग,पाणी पुरवठा विभाग, घरपट्टी विभाग, खुला भुखंड विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग,इत्यादी सर्व विभाग प्रभाग अधिकाऱ्यांच्या अधिपत्त्याखाली करण्यात यावे. यासाठी नागरीकांना पुरवलेली सर्व सेवा त्यांना प्रभागातच मिळणे सहज शक्य होईल. तसेच पिंप्राळा परिसरात मनपाचे अद्यावत रुग्णालय नाही. वाढलेली लोक संख्या लक्षात घेता.तेथे रुग्णालय करणे आवश्यक आहे. त्यासाठी सोमाणी मार्केटच्या पहिल्या मजल्यावर मनपाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्यात यावे. किरकोळ विभागातील हॉकर्स कडील वसुली,अनेक किरकोळ स्वरुपाची किरकोळ वसुली,व मोठया प्रमाणावर गाळे भाडे सुध्दा नमुद करण्यात आलेले आहे. मात्र किरकोळ वसुली विभागाअंतर्गत फक्त किरकोळ वसुली ठेवण्यात यावी. व गाळे भाडे, व हस्तांतरण यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावा.व तो प्रभाग समितीला जोडण्यात यावा. या सर्व बाबींचा विचार करता. प्रभाग समिती कार्यालय अद्यावत करणेसाठी व पिंप्राळा भागात मनपा रुग्णालय व इतर काही इमारतींसाठी एकत्रित तरतुद २५ कोटीने वाढविणे आवश्यक आहे. तरी सदर हेड खाली २५ कोटी १५ लाख तरतुद ठेवण्यात यावी. प्रशासनाने १५ लाख तरतुद ठेवलेली होती. यांनी सुचना केल्यानुसार त्या बजेट मध्ये २५ कोटीची तरतुद ॲड केली. एकुण २५ कोटी १५ लाख तरतुद केली. आणि त्याचा खर्च शुन्य आहे. २५ कोटी १५ लक्ष रुपयाची तरतुद आणि खर्च मात्र शुन्य,म्हणजे काय अर्थ राहिला, शुचितातार्इंनी अभ्यास केला असेल, पोटतिळकीने

बोलले असतील, सगळे काही झाले असेल.परंतु निष्पण काय निघाले, सन २०१९-२० गेले, २०२०-२१ गेले, २०२२-२३ जाईल. अशीच ही पंचवार्षिक योजना जी आहे महापालिकेची ही आली आणि गेली. तीन चार महापौर आले, तीन चार महापौर गेले, चार पाच सभापती आले, चार पाच सभापती गेले, शहर जिथे आहे तिथेच राहिले. अश्या अर्थसंकल्पाला काही अर्थ राहणार नाही. जो पर्यंत त्याच्यातला खरं अर्थ त्याच्यातुन एकत्रीत रित्या वसुल केला जाणार नाही. खर्च कधीच कमी होणार नाही. खर्च हा दिवसांदिवस वाढत राहणार. विकास कामांवरती होणारा खर्च ही वाढत जाणार. कर्मचाऱ्यांचा ७ वा वेतन आयोग लागु झाल्यानंतर त्याचा खर्च वाढत जाणार. प्रत्येक बाबींवरचा खर्च वाढत जाणार. यापुर्वी १ कोटी रुपये निधीमध्ये खुप मोठया प्रमाणावरती कामे साध्य होत होते आप्पा. आज १ कोटीमध्ये आपण बघतो, एक रस्ता होत नाही. आणि जर कधी आपल्या हक्काच्या वसुल्याच जर होत नसतील तर मला वाटत नाही की, आपण यापुढे महानगरपालिकेच्या माध्यमातुन या शहरातील नागरीकांचे स्वप्न पुर्ण करु शकु. किंवा कमीतकमी नागरीकांच्या चेहऱ्यावर कुठलेतरी, शुचितातांईचे मनोगत होते, शेवटचे काही वाक्य मी वाचतो, ताईंनी म्हटल होत की, याच्यामध्ये, शेवटी ऐवढेच म्हणेल,मला दुख आहे मागे पायाभुत सोईचा खुपमोठा अनुशेष आहे. मला आनंद आहे जळगांव शहराच्या सर्वांगीन विकासासाठी भरगोस तरतुद असलेला अर्थसंकल्प मांडणेचा मला विश्वास आहे, जळगांव शहरातील पायाभुत सुविधांचा अनुशेष अर्थसंकल्पातुन भरवुन निघेल.सर्व सामान्य जळगांवकरांचे आयुष्य आम्ही समाधानाने करु शकु. हे त्यांनी कोट केलेले आहे. याच्यातुन काहीच साध्य झाले नाही. म्हणजे जी पहिली लाईन आहे की, मला दुख आहे की, मागील काळात पायाभुत सोईचा खुप मोठा अनुशेष आहे.तीच लाईन मला आज पुन्हा रिपीट करावी लागते. मला दुख आहे की, मागील काळात पायाभुत सोईचा खुप मोठा अनुशेष आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला बोलायचे आहे. नविन बी.जे. मार्केटचे आता साधे उदाहरण देतो प्रशासनाचे, आता भाऊंनी सांगितले, प्रशासनावर रोष होता, आता मला सांगा, ३१ तारखेला मुदत संपत आहे प्रशासनाची, नविन बी.जे.मार्केटची, ४०० लोकांनी आपल्याला प्रकरणे दिलेले आहे २०१३ पासुन त्यांनी काय केले, ती व्याजाची रक्कम, आता पर्यंत ती व्याजाची रक्कम त्या लोकांना भरायला लावत आहे. ते लोकं भरायला तयार आहे. ते ४०० लोकं, मग आता जे व्याज लावलेले आहे त्यांनी. २०१३ पासुन ते आतापर्यंत ते पण भरायला लावता आहे त्यांना.आता तुम्ही सांगा, नागरीक मार्केटवाले भरायला तयार आहे २०१३ पासुन तुम्ही तेव्हा का निर्णय घेतली नाही. आणि आता तुम्ही म्हणत आहात की, मुदत संपते आहे. आता जे भाऊ बोलले ते बरोबर आहे. आता प्रशासन काय करत आहे त्याच्यावर. याचे उत्तर द्यावे प्रशासनाने. न्यु बी.जे.मार्केट, ४०० लोकांनी २०१३ मध्ये अर्ज केलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नवनाथभाऊ आपण या संदर्भात सकाळी चाटे साहेबांशी ही बोललो आणि यापुर्वी आयुक्त मॅडमांशी ही बोललो होतो. आता ३१ तारखेपर्यंत त्यांच्या शास्ती माफी संदर्भात जी आहे. सकाळी मार्केटचे काही प्रतिनिधी भेटले होते. आणि त्यांना आपण प्रशासनाशी चर्चा करुन त्यांना ज्या पध्दतीने अश्वस्त केले होते की, आपणच यापुर्वी ठराव केलेला होता. आणि एक ठराविक काळमर्यादा ठरवुन दिलेली होती की, त्या तारखेपर्यंत भरतील. तर त्यांना माफीची सवलत होती. आणि त्या तारखेपर्यंत नाही भरले तर त्यांना २५००० दंडाची आकारणी करणार होतो. अश्या पध्दतीचा आपला हा ठराव आहे. म्हणजे प्रशासनाने त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीकोणातुन त्या ठरावातील अडचणी असतील परंतु त्याच्यातला मध्यमार्ग असा काढला की, त्यांनी ती २५००० ची रक्कम कमी भरुन आज त्यांनी त्यांचे प्रकरणे दाखल करुन घ्यायचे उर्वरित रकमेचा चेक देऊन.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ, त्यावेळेस ४०० लोकांनी दिलेले आहे ना प्रकरण. त्यांनाही सरसकट लावलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, सगळयांचे प्रकरणे होतील, सगळयांचे पैसे २५००० वजा करुन ३१ तारखेच्या आत मध्ये त्यांनी भरावे.असे आपण त्यांना सुचना केलेल्या आहे. आणि आपली पुढची महासभा जी आहे. १० तारखेला नाही तर केव्हा महासभा होईल. त्या महासभेमध्ये त्या मागच्या ठरावामध्ये जी अट टाकलेली होती २५००० ची वसुल करण्याची ती शितील करण्याच्या संदर्भातला निर्णय घेऊ. जेणे करुन त्यांना त्याचा फायदाही करता येईल.आणि प्रशासनाला त्याची अंमलबजावणी करतांना कुठलीही अडचण येणार नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** मा.महापौर साहेबा आज हि आपली विशेष अर्थसंकल्पाची सभा आहे. या सभागृहाचा या बॉडीचा हा शेवटचा अर्थसंकल्प आहे. तर पुढे या बॉडीची टर्म संपेल. पुढील येणाऱ्या टर्मसाठी हि बॉडी हा अर्थसंकल्प ठरवुन देते आहे. हा सगळयात महत्वाचा भाग आहे आणि जस नितीनभाऊ बोलले. त्यांनी त्यांच्या ज्या खंत या व्यक्त केलेल्या आहेत कि जमाबाजु, कारण जमा करण्याचे , तरतूदी करण्याच काम या सभागृहाच आहे. जमा करण्याच काम हे प्रशासनाच आहे आणि खर्च करण्याच काम सुध्दा या सभागृहाच आहे. तर जेव्हा जमा होईल आपल्याकडे काही रक्कम तेव्हाच आपण खर्च करू शकणार आहोत आणि या शहराचा विकास करणार आहोत. गेल्या साडेचार/ पाच वर्षामध्ये या सभागृहाने जस नितीनभाऊंनी सांगीतले की अर्थसंकल्पात तरतूदी त्या-त्यावेळेसचे स्टँडींगचे चेअरमन असतील. त्यांनी ज्या ज्या तरतूदी केल्या असतील , महापौर असतील, किंवा आजची सभा असेल. तर या सगळया तरतूदी करण्याच कारण असे आहे नितीनभाऊ की आपल्याकडे पण नागरीकांची मागणी असते आपल्याकडे व्हिजन असतो. तो सर्व व्हिजन घेवुन आपण सभागृहात चर्चा करत असतो आणि त्या तरतूदी करतांना विशेष करून आपल्याला काही भागाचा या शहराच्या विकासाचा दृष्टीकोन आपण डोळयासमोर ठेवतो. मला वाटत मी मागच्याच सभेत बोललो होतो नितीनभाऊंना हा आताचा विषय आहे आपली चर्चा झालेली होती की आतापर्यंत शासनाचे निधीवर हे जळगांव शहर महानगर चालतय तिथही वर्ष आहे की या शहरामध्ये दिडशे , दोनशे व अडीचशे कोटी , तिनशे कोटी रूपये निधी शासनाने कमीत कमी व शासनाच्या वेगवेगळया निधींच्या माध्यमातुन आपल्याला मिळत आहेत आणि आपण त्या निधीच्या माध्यमातुन काम करतोय, सभागृह , नगरसेवक वारंवार , नागरीक सुध्दा मला बोलतात की, हे शासन तुम्हाला निधी मधुन कामे करतात. तर मनपाचे कतृत्व कुठे आहे ते दाखवा. मनपाची काही लायबिलीटी आहे का काही सुधरण्याची आणि हे करण्याची, तर त्याअनुषंगाने हा जो विषय आहे मी हा छोटासा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. म्हणजे काही जास्त यावेळेस केले नाहीये. तर प्रशासनाच्या मागच्या ज्या तरतूदी आहेत त्या तशाच ठेवलेल्या आहेत. बऱ्याचशा तरतूदी तशाच्या तशा ठेवलेल्या आहेत की त्याच्यात आपल्याला बदल करावा आणि हे करावे. त्याच्याने अर्थसंकल्पात प्रशासनाने काही जास्त काम ठेवलेले नाहीये. तर जस नितीनभाऊंनी सांगीतले की पान नंबर १, २, ३ खुलाभुखंड कर वसुली मालमत्ता कर हा तर खुलाभुखंड वसुलीचा जो विषय आहे. खुप गंभीर विषय आहे आणि खुप मोठा विषय आहे. याच्यावर गेल्या अनेक वर्षांपासुन बरेच प्रकार बदलत गेले , टॅक्सेशनची ही पध्दत बदलत गेले. पण आता जो टॅक्सेशनचा प्रकार आपला सुरू आहे त्याच्यावर पण मागे आपली एक मिटींग नितीनभाऊ महापौरांकडे झाली होती या संदर्भात की याची एक पॉलीसी व्हावी आणि नितीनभाऊ तुम्ही उदाहरणपण दिले होते. त्या धर्तीवर एक विषय होता तर हा जो खुलाभुखंड विभाग आहे हा घरपट्टीत वर्ग करण्यासाठी मी गेल्या मागच्या दोन वर्षापासुन प्रशांत पाटील साहेबांच्या मागे लागुन पाठपुरावा करून तो तिकडे वर्ग केला. त्याचे एकच हे होते की वसुली वाढवावी म्हणुन पण आपण जर वसुलीचे जे जर आकडे बघितले तर ते खुप कमी आहे. त्याच्यात अडचणी पण खुप आहेत. प्रशासनाला जेव्हा हे पुर्ण सभागृह प्रशासनाच्या बाजुने उभे राहते त्यावेळेस मग ते कर्मचारी असतील किंवा अधिकारी असतील. त्यापध्दतीने प्रशासनाने सुध्दा या वसुलीच्या संदर्भात व नियोजनाच्या संदर्भात पुढाकार घेतला पाहीजे आणि वारंवार सुचना ह्या आपल्याला हे सभागृह वेळोवळी देत असते. पण आपली याच्यावर काही अंमलबजावणी वेळेवर होत नाही. कारण नितीनभाऊंनी सांगीतली की ३४ कोटींची डिमांड खुलाभुखंड आकारणी वर स्टे आहे. त्याच एकमेव कारण हे आहे की डिमांड कमी कारण महत्वाच आहे. कारण याच्यावर बरेचशे घर बांधुन झालेले आहे आणि त्यांना घरपट्टी सुध्दा लागलेली आहे. तर ते घरपट्टीकडे वर्ग करण्याचे एकमेव कारण हे आहे. दुसरे कारण असे आहे की, घरपट्टी विभाग ज्या एरियात जातो त्या एरियामध्ये एखाद्या कॉलनीमध्ये दहा घर असतील आणि ९० खुला भुखंड असतात. हे घरपट्टी विभागाला माहिती पडते आणि तो त्या दहा घरांच्या लोकांना विचारू शकतो की हि मालमत्ता कोणाची आहे. या प्लॉटचा ओनर कोण आहे कारण आपल्याकडे पत्ते नाहीये आपण बिल बजावु शकत नाही. पण मध्यंतरीच्या काळामध्ये पत्तेसुध्दा मिळवलेले आहे पण त्यांचे मोबाईल नंबर सुध्दा आपल्याकडे रेकॉर्डला आहेत. आता जे डिमांडला लेआऊट झालेले आहेत. त्यांनी खरेदी विक्री केली असेल नसेल पण ज्याच नांव आपल्या डिमांडला आहे त्याला आपण फोन करून किंवा एसएमएस टाकुन किंवा त्या पध्दतीने ते आपण करू शकतो आणि या बाबतचा सर्वे आपण पुर्ण करू शकतो. तर या दोन गोष्टी खुलाभुखंड विषयामध्ये लक्ष देवुन करून घेतल्या पाहीजे जेणेकरून मालकाचा पत्ता शोधणे. त्याचा पत्ता मिळाल्यावर त्याला नोटीस तर त्याला पाठवा तो येईल आपोआप की हा प्लॉट मी विकला आहे, कोणाला विकला आहे तो येईल, म्हणजे काहीतरी प्रकीया केल्याशिवाय आपल्याला हे विषय पुर्ण करता येणार नाही. त्याची वसुली खुप कमी आहे. खुप कमी आहे म्हणजे ती आपल्याकडे वाढु शकते. तर आपण प्रशासनाने याच्यावर तातडीने बारकाने लक्ष दिले पाहीजे. तर याच्यात जी तरतूद जी लिहीलेली आहे वसुलीची ती ३ कोटी ४९ लक्ष ३६ हजारांची तरतूद केलेली आहे नितीनभाऊ, जसे नितिनभाऊंनी सांगीतले की आपणच ही इतकी कमी केली आहे तर प्रशासनाला टारगेट जर मोठ दिल नाही. तर वसुली कस काय

होणार आहे. जर टारगेट मोठ दिल तर त्याला तिथपर्यंत याव लागेल ना त्या टारगेट पर्यंत तर साधारण १० कोटी रूपये त्याची तरतूद ठेवली पाहीजे. आता आपल्याला खुला भुखंड विभागातुन वसुल करायचे आहे आणि टारगेट ठेवले तर कुठेतरी वसुल करायचे आहे तर ७ कोटी, ८ कोटी किंवा ९ कोटी येतील म्हणजे जेणेकरून शहराच्या विकासासाठी हा निधी उपलब्ध होणार आहे म्हणजे शहराच्या विकासासाठी , आपल्याला ती खर्च बाजु वाढवता येते आणि तीथे आपल काम शुन्य-शुन्य तरतूद झालेली कुठेतरी आपल्याला त्याच्यातुन करुन आपले टारगेट, जी आपली पॉलीसी ठरलेली असेल. जे टारगेट आपल ठरलेले असते ते पुर्ण करता येत. ज्या छोटया छोटया गोष्टी आपण सुरूवातीला पुर्ण करू शकतो. त्यानंतर आपला घरपट्टी विभाग तर घरपट्टी विभागाचा विषय जर आपण घेतला तर वसुली आणि डिमांड आता नितीनभाऊंनी सांगीतले की, २०३ कोटींची आपली डिमांड, उरलेली रक्कम म्हणजे मागील थकबाकी पण आपण घेतलेली नाहीये, नितीनभाऊ ती सुध्दा आपल्या डिमांडला यायला पाहीजे कारण आपले ते घेणे आहे ते पैसे आज ना उद्या आपले येणार आहे. ते काही बुडीत नाही ठेवणार आहे आपण ते डिमांडवर यायला पाहीजे किंवा हे पैसे जसे माझी उधारी बुडाली असे नाही म्हणता येणार. कोर्ट असेल, चेक बाऊंन्स झाला असेल.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आज जी डिमांड दाखवलेली आहे ना आज जे ४८ टक्के जे उत्पन्न दिसताय.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** हा

**श्री.नितीन लढ्ढा** :- ते ३० टक्क्यावर येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** भाऊ अस नाहीये याच्यासाठी प्रशासनाने हे जे डिमांड दाखवली आहे ना तर ती ३० टक्क्यावर येईल. पण ती ५० टक्के दाखवली तर ते तुमची ९० टक्के वसुली दाखवतील हे नाही व्हायला पाहीजे. तर शेवटी डिमांड हि तुमची बुडीत नाही. आज तुमची उधारी ही बाकी आहे तर जसा एखादा व्यापारी खटपट करतो की त्याचा चेक बाऊंन्स झाला तर त्याला एखादी नोटीस पाठव, कोर्टात केस दाखल कर भरपुर प्रक्रीया आहेत ना आपल्याकडे प्रशासनाकडे आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- याच्यामध्ये कस आहे माहित आहे का प्रशासनाकडे राईट ऑफ पेमेंट जो असतो त्याच्याकडे राईट ऑफ पेमेंट करण्याचा आपल्याकडे अधिकार नाहीये. नाहीतर आपणही राईट ऑफ करून टाकले असते की हे येणारच नाहीये तर हे कमी करून टाका.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** बरोबर आहे नितीनभाऊ पण काय आहे शेवटी काय आहे की वसुलीचे आपले २०३ कोटी डिमांड असतांना आपली ११० कोटी वसुली होते याच्यामध्ये काय होत की मी सांगतो प्रमाणिकपणे की म्हणजे आता जे पैसे येता आहे ना हे ॲटोमेटीक येत आहेत. लोक येवुन भरून जात आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा** :- स्वेच्छेने भरून जात आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी:-** स्वेच्छेने येवुन भरून जात आहेत. तुम्ही दंडात सुट देत आहेत किंवा तुम्ही १० टक्के सुट देत आहेत किंवा अजुन सुट मिळत आहे म्हणुन तो माणुस येवुन तुमच्याकडे पैसे भरून जातोय. आता आपले प्रयत्न किती आहे. आपली थकबाकी किती आहे की आपली थकबाकी किंवा त्यांची बाकी तर एप्रिल महिन्यानंतर घरपट्टी विभागाला डिसेंबर महिन्यापर्यंत फार मोठ अस काम असत अशातला भाग नाहीये. त्यांना पाठवा बाहेर या खुलाभुखंडासह कोणत्याही वसुलीचा विषय असेल तर त्यांचे ॲक्शन प्लॅन तयार करून घेतले पाहीजे की कुठे बाकी आहे. याच्या संदर्भामध्ये याच्या मध्ये माझ तर मत येथे आहे की जर याची वसुली, नितीनभाऊ ११० कोटी वसुली केली भाऊ तर ३५ कोटी अजुन वाढवली पाहीजे. तर ३५ कोटीची वाढ केली पाहीजे याच्यामध्ये

**श्री.नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ आता याच्यामध्ये

**श्री.विशाल त्रिपाठी:-** तुम्ही काय म्हणता आहे समजत आहे मला याच्यामध्ये या तरतूदी आपल्याला कराव्या लागणार आहे. उद्या छोटस ईस्टिमेट जरी करायच म्हंटल तर त्याला आजच्या तारखेत सांगतो मी बऱ्याचशा नगरसेवकांच्या आलेल्या ईस्टिमेट साठी बजेटमध्ये तरतूद नाही. तुम्हाला काहीतरी ठेवावे लागणार आहे. बजेट तरतूद तुम्ही जर का १० रुपयांची ठेवली आणि उद्या जावुन दहा रूपयांच काम झाले आणि काही काम राहीले तर त्यांचे काम होणार नाही. म्हणुन तर आपल्याला याची काहीतरी तरतूद ठेवावी लागेल आपल्याला.

**श्री.नितीन लढ्ढा** :- विशालभाऊ याच्यामध्ये आहे काय झालेले आहे मॅडम की आता नविन रस्त्यांसाठी छोटीशी तरतूद ठेवलेली आहे आपण, आता आपल्याला एक छोटस उदाहरण देतो की आता ८ कोटी रूपयांची तरतूद बघितली तर ती इतकी तोकडी आहे की माझ्या प्रभागातील हौसिंग सोसायटी परिसरातील परिसर आहे. कोर्टाच्या मागचा भाग, खुप मोठा भाग आहे अशातीलही काही भाग नाहीये. तेवढ्या परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. चार पाच गल्ल्या आहे उभ्या आडव्या त्यांच ईस्टिमेट जात १ कोटी ६० लाख रूपये, शहरातला एक कोपरा सुध्दा म्हंटला जात नाही, की तेवढ्याशा भागाला जर कधी दिड कोटी रूपये लागत असेल तर संपुर्ण जळगांव शहर आहे. तर ८ कोटी रूपयांची

जी तरतूद आहे ती अत्यंत तोकडी आहे म्हणजे नगण्य म्हंटली जाते. ठिक आहे जस विशालजी म्हणताहेत की आपण घरपट्टीच्या मध्ये ती वाढ दर्शवुन ती वाढ दर्शवायला पाहीजे. परंतू शेवटी प्रश्न तोच येईल की त्या सगळ्या विकास कामांची मदार जी राहील. ती वसुलीवरतीच राहील. जी आहे ॲक्चुल डिमांड जी राहायला पाहीजे त्याबद्दल काही दुमत नाही. ती राहायलाच पाहीजे दाखवायलाच पाहीजे आणि त्याच्या अनुषंगाने राहीलेल्या विकास कामांच्या गटारींच्या किंवा ज्या काही नागरी समस्या असतील त्याच्याबाबतीतल्या तरतूदी वाढवायला पाहीजे. परंतू मी म्हणतोय की दुख: याच बाबतीच आहे की त्या सगळ्या गोष्टी मग कागदावर येतात. म्हणजे शुचिताताईंच्या काळामध्ये त्यांच एक स्वप्न होत की ब्राम्हण सभेजवळ एक अंडरपास रेल्वेसाठी बोगदा तयार करण्याच्या दृष्टीकोनातील खुप चर्चा झाली त्यानंतर सात आठ लाख रूपयांची तरतूदही केली अर्थसंकल्पात केली त्याचे सर्वेक्षणही झाले. पण मी म्हणतो ना कि या सगळ्या गोष्टी बारगळ्या जातात आणि त्याच दुख: होत आणि अस वाटत की उगाचच मग आपल्याकडुन या गोष्टी साध्य होणार नाही तर मग उगाचच आपण नागरीकांची दिशाभुल करायची का? की काहीतरी तरतूदी दाखवायच्या आणि त्यांना मोठ मोठी स्वप्न दाखवायची.

**ॲड. शुचिता हाडा** :- नितीनभाऊ मी थोडस सांगेल की, याबाबत शेवटी आपण स्वप्न बघतो ते पुर्ततेकडे येण्यासाठीच बघतो आणि आपण लोकप्रतिनिधी म्हणुन कुठल्याही पक्षाचे असु द्या आपण पुर्ण प्रयत्न सुध्दा तेवढेच करतो. आता आपले प्रयत्न अपुरे पडतात का नाही. आपण प्रयत्न पुर्ण करतो. कारण आपण अन्सरेबल असतो कुणाला तरी, आपल्याला उत्तर द्यायच आहे आपण दायित्व स्विकारलेल आहे काही लोकांच पण आपल्याला जर प्रशासनाची साथच मिळत नाही. त्यापर्यंत त्या स्वप्नांची परिपुर्ती होवु शकत नाही. तुम्ही आता मला माझे वाक्य वाचुन दाखवले. मला खेद आहे, मला आनंद आहे सगळ सत्य आहे हे सगळ ते स्वप्न मी सभापती असतांना मी जेव्हा होती. आता विशालभाऊ अशी मागणी करता आहेत की आपल्याला तरतूदी करून ठेवाव्या लागतील. शेवटी लोकप्रतिनिधी म्हणुन आज आपल दायित्व काय आहे. आपल्याला निदान त्या तरतूदी कागदावर कराव्याच लागतील. आज जर त्या आपण कागदावर केल्या नाहीत तर भविष्यात आपण त्या स्वप्नांच्या परिपुर्तीकडे जाऊच शकणार नाही. प्रशासनाची साथ ईथुन तरी आम्हाला मिळेल अशी आम्ही आशा बाळगतो आहे. आपण म्हणतो उम्मीद पे दुनिया कायम है, आम्हाला मागच्या काळात प्रशासकीय अनुभव अत्यंत वाईट आहे पण निदान आता ईथुन पुढे प्रशासनाची साथ मिळेल. आपण आयुक्त महोदया ज्या आकृतीबंधाचे जे काम केलेले आहे. त्याची परिपुर्ती झाल्यानंतर मनुष्यबळा अभावी जी आपली सगळीच कामे खोळंबलेली असतील. वसुली आपली का होत नाही नितीनभाऊ याच सुध्दा प्रशासन शेवटी कारण काय देत की आपल्याजवळ मनुष्यबळच नाही.तर भविष्यात या सगळ्या गोष्टीमध्ये मदत करतील ही आपल्याला आशा आहे आणि म्हणुन शेवटी आपल्याला हे करून ठेवाव लागणार आहे कारण शेवटी मान्य आहे की तुम्हाला अशी खंत वाटणे आणि नैराश्याकडे झुकणार आजच तुमच मनोगत आहे. तर गेला काही काळ आपण सगळयांचा जो अनुभव आहे. त्यामुळे तुम्ही नैराश्याकडे झुकलेले असाल. पण तरी सुध्दा विशालभाऊ येथे आशावादी आहेत. तरी मी विशालभाऊंच्या बाजुने बोलेल की हा आशावाद सभागृहाने कायम ठेवलाच पाहीजे. या आशावदा शिवाय आपण प्रशासनाला कामाला कस लावणार.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई प्रश्न नैराश्याचा नाहीये. मी तुम्हाला एक उदाहरण देतो आता तुम्ही या मुद्दयाच्या संदर्भातील विषय केला. मनामध्ये ईच्छाशक्ति असली ना तर काहीही साध्य होवू शकते. त्याच एक उदाहरण सांगतो की मी महापौर असतांना तापी प्रिस्टीयर याच्याकडून आपण वाघुरच काम केलेल होत. त्यांच पावणेचार कोटी रूपयांच एक डिपॉझिट महानगरपालिका अकाऊंटला जमा होते आणि त्याच्यासंदर्भातील न्यायालयीन वाद सुरू होता आणि न्यायालयीन वाद सुरू असल्याकारणाने त्या पैश्यांना हात लावायचा नाही हा न्यायालयाचा निवाडा येईल त्यावेळेला त्या पैश्यांच नियोजन करता येईल. जिवन सोनवणे साहेब आयुक्त होते आणि त्या पैशांच जस संपुर्ण विभागांचा अहवाल बघितला की कोणता कोणता निधी कशा कशा पध्दतीचा पडलेला आहे आणि त्याच कस आपण नियोजन करू शकु. तर त्या पावणेचार कोटी रूपयांच्या निधीचा आपण कशा पध्दतीने वापर करू शकतो. तर त्यांनी हि कारणे सांगीतली की तो न्यायालयाचा निर्णय केव्हाही येईल आणि न्यायालयाचा निर्णय आपल्या अगेंन्स्ट मध्ये गेला तर ती रक्कम त्या मक्तेदाराला द्यावी लागेल. मी म्हंटल की तो न्यायालयाचा निवाडा १० वर्षानंतर लागेल, २० वर्षानंतर लागेल तोपर्यंत ती रक्कम तुम्ही तशीच ठेवाल का म्हंटल, अस होत नाही ना आणि एवढी काही महानगरपालिका भिक लागलेली नाही की, उद्या जावुन महानगरपालिकेच्या विरोधात जर काही निकाल लागला तर ते ३ कोटी रूपये महानगरपालिका देवु शकणार नाही अशातली काही गोष्ट नाहीये. मला त्यावेळेला पिंप्राळा परिसरापासुन तर या सगळ्या भागातील नागरीकांचे एक डेलिगेशन आलेल होत आणि हा प्रसंग होता आणि या पिंप्राळा गेटवरून चार चाकी वाहन जात नव्हते आणि ते रेल्वे गेट दिवसातुन कमीत कमी २५ वेळा बंद होते आणि त्याच्यातुन ती मोठ्या

प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते. तर त्याला पर्यायी अजुन एक बोगदा बनवायच्या दृष्टिकोनातुन रेल्वे प्रशासनाचाही पाठपुरावा केला. महिन्याभरानंतर रेल्वे प्रशासनाकडून ईस्टिमेट आणल. पावणेचार कोटी रूपये मी जिवन सोनवणे साहेबांना विनंती केली आणि मी त्यांना सांगीतले की अशाच पध्दतीने हा निधी असाच पडून राहुन आणि याच्यामुळे काही उत्पन्नात वाढ होणार नाहीये. परंतू जे क्लॉज वाढवात ते आपण बघितले की पुढील ५ वर्षांच्या नंतर आपण या बोगद्याचा कार्यक्रम हाती घेतला तर आज त्याला पावणेचार कोटी लागतात, उद्या त्याला ७ कोटी , ८ कोटी लागतील म्हंटल आणि ते त्यांनी मान्यही केल. पावणेचार कोटी रूपये डिपॉझिट केले तो पावणेचार कोटी मधुन तो बोगदा निर्माण झाला. आज मला सांगा या उड्डाणपुलाच काम सुरू आहे. लाखो लोकांची वाहतुक जी सुरू आहे ती त्या बोगद्यातुन होते आणि गेल्या ५ वर्षापासुन त्या परिसरातील बोगद्याचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नव्हती. आपण दोन उद्याने लोकसहभागातुन तयार केले. मेहरूण तलावाचे सुशोभिकरण लोकसहभागातुन केले. काय आहे ईच्छाशक्ति असली की सगळ काही होत नैराश्य हा विषयच नाहीये. परंतू ईच्छाशक्तिचा जर कधी अभाव असेल मग ती प्रशासनाची असेल की बॉडीची असेल. मी म्हंटले ना आता की ही जबाबदारी जी आहे ती संपुर्ण सामुहिक जबाबदारी आहे. आपण याची जबाबदारी प्रशासनावर ठरवुनही चालणार नाही. याच्यामध्ये सगळ्यांच योगदान असण आवश्यक आहे तरच हा गाडा पुढे जावु शकतो.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- विषय हा एक आहे की याच ठिकाणी प्रशासन म्हणुन आयुक्त रामनाथ सोनवणे साहेब होते. त्यावेळेची परिस्थिती तुम्ही आठवा आणि आजची परिस्थिती आठवा. त्या माणसाची ईच्छाशक्ति तुम्ही जे बोलले ना, तर ती तुमची कितीही ईच्छाशक्ति असो लोकप्रतीनिधींची माझी, शेवटी ९० टक्के काम प्रशासनाच असत. त्याच्याशिवाय काहीही नाही होत. त्यावेळेस पगाराला पैसे नसायचे. रामनाथ सोनवणे साहेबांनी स्वत: लोकांकडे जावुन पैसे आणलेले आहेत. फोनवरून पैसे मागवले आहेत. आपण जस आता नितीनभाऊंनी सांगीतले मी एक छोटस उदाहरण देतो. मी उदय पाटील साहेबांच अभिनंदन करेल, ग.स चे चेअरमन ३ चेक त्यांनी काढुन आणले कोर्टातुन आणले आहेत ते आपले २ कोटी ७१ लाख रूपये जमा आहे. आपण का करू शकत नाही. आपल्याकडे डिपार्टमेंट आहे. आपल्याकडे सर्वकाही सुविधा आहे. हायकोर्टात वकील आहे म्हणजे सांगायचे तात्पर्य तुम्हाला माहिती आहे याच्यामध्ये प्रशासनाने जर मनावर आणल ना , लोकप्रतिनिधी प्रशासनाला साथ देतात की नाही नितीनभाऊ तुम्ही हे करा कधीही प्रशासनाच्या विरोधात कधीही या महापालिकेच्या , आयुक्तांच्या विरोधात कधीही भुमिका कधीच घेतलेली नाहीये कोणी, एखादा वगळला तर, तर माझ मत घरपट्टी विभागाबाबत माझ अस म्हणण आहे की ३५ कोटी रूपयांची अजुन वाढ केली पाहीजे वसुलीमध्ये, आता तिसरा विषय जो आहे पान नं. ५ वर गाळेनुकसान भरपाई ती नितीनभाऊंनी सांगीतल की गाळयांचा विषय जो आहे हा २०१२ पासुन प्रलंबित आहे. पण त्यावेळेसचे मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडवणीस, त्यानंतर याच्यापाठीमागे आपले जळगांव शहराचे आमदार , आपले मंत्री गिरीषभाऊ महाजन त्यावेळेस कायद्यात बदल होतांना आणि कायद्यात बदल घडवुन आणल्यानंतर ते ८ टक्के भाडे बदल आणि त्याची नियमावलीत बदल झालेला आहे नितीनभाऊनाही माहिती आहे ती शासनाने केली आहे. पण काही टेक्निकल किंवा काही अडचणी आल्या असल्यामुळे जी शासनाकडुन ऑर्डर झाली आणि ती थोडी व्यापाऱ्यांची नाराजी झाली. पुन्हा देवेंद्रभाऊ विरोधीपक्ष नेते असतांना आणि आताचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब नगरविकास मंत्री असतांना, सभागृहात देवेंद्रभाऊंनी सभागृहात जळगांव महापालिकेचा प्रश्न उपस्थित केला गाळयांचा आणि शिंदे साहेब नगरविकास मंत्री यांनी स्थगिती दिली. याचसंदर्भात आपल्या शहराचे आमदार राजुमामा भोळे यांनी या अधिवेशनामध्ये लक्षवेधीमध्ये दोनदा या गाळयांचा विषय मांडलेला आहे. मी कालपण मामांना म्हंटल की मामा बजेटची मिटींग आहे. गाळयांच्या वाढ उत्पन्नात कमी दिसतय वाढवायच का तर मामांनी सांगीतले की हा गाळयांचा विषय येत्या दोन ते तिन महिन्यात मार्गी लागणार आहे आणि आपल्याला ती रक्कम वसुल होणार आहे. त्यामुळे तुम्ही जी ८१ कोटींची तरतूद दाखवलेली आहे. ती १०१ कोटी करण्यात यावी.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भाऊ त्याच्यात काही बदल होईल ना, व्यापारांच पण आपल्याला बघाव लागेल, सगळच आपल्याला बघाव लागेल. सगळयांच्या हिताचा गाळयांचा हा निर्णय होईल. शहराच्या हिताचा निर्णय होईल. शासन तर जे निर्णय देईल ते आपल्याला मानाव लागेल.

**श्री.अनंत जोशी** :- विशालभाऊ तुम्ही जे म्हणताहेत ना, १० वर्षापासुन तुम्ही व्यापाऱ्याचे हित काढुन घेतले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- अस नाहीये बंटीभाऊ कामही केलेल आहे. म्हणजे आता ईथे राजकारण जर यायच म्हंटल तर मग मी मागे घेईल.

**श्री.अनंत जोशी** :- सुरू करा मग

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बिल्कुल येस, व्यापाऱ्यांच हित, व्यापाऱ्यांनी पैसे भरले आहेत महापालिकेत ९० कोटी रूपये भरले गेले आहे. का बर भरले त्यांनी की त्यांना जे बिल जे सरसकट देण्यात आले होते. ते आपण दुरूस्त केले त्यांना विश्वासात घेतले त्यांना समजवल आणि त्याप्रमाणे ९० कोटी रूपये या पंचवार्षिकमध्ये व्यापाऱ्यांनी या महापालिकेत भरणा केलेला आहे. अस थोडी म्हणता येईल. तर त्याचा पाठपुरावा प्रामाणिक पण करावा नितीनभाऊ तुम्ही सुध्दा साक्षीदार आहेत.

**श्री.अनंत जोशी** :- विशालभाऊ सुरूवातीला व्यापाऱ्यांना आपण मोफत गाळे देवु हे वाक्य कोणी वापरल. त्याच्याचमुळे हे झालेल आहे आता मी राजकारणात जाणार नाही. त्याच्यामुळे मी बोलतही नाही पण सगळयात पहिले हे कोण बोलल की तुम्हाला पैसे भरायची गरज नाही आम्ही तुम्हाला मोफत गाळे देवू. तुमच नांव लावुन देवु हे वाक्य कुणाच होत हे सांगा तुम्ही आणि तिथुनच सगळा सत्यानाश झालेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आता काय बोलणार, बोलायचच म्हंटल तर आपण तर व्यापाऱ्यांच्या हितानेच पाठपुरावा करतोय. मामांनी लक्षवेधी मांडली हे तर मान्य आहे की नाही, कबुल आहे की नाही. करतोय तो माणुस, गिरीषभाऊ सुध्दा पाठपुरावा करत आहेत. अश्विनभाऊ आणि आमची परवा चर्चा झाली गिरीषभाऊंशी

**श्री.नितीन लढ्ढा** :- मामांनी लक्षवेधी मांडली आहे. पण कमीत कमी गाळयांचा विचार तर व्हायला पाहीजे. मला सांगा. एक-एक वर्षापासुन स्थगिती दिली जाते आणि आपण वर्षभरानंतर लक्षवेधी मांडतो आणि त्या लक्षवेधीचा निर्णय हा पुढच्या सभेमध्ये मान्य होईल. त्याला काही अर्थ आहे का ? म्हणजे आपण झोपेचे सोंग करायचे आणि कुणाला तरी उठवायला हलवायला लावायच याला काय अर्थ आहे. अधिवेशनात लक्षवेधी मांडून काय साध्य करतोय आपण, स्थगिती दिल्यावर आपण स्टे आणला पाहीजे, स्थगिती दिल्यानंतर आपण आठ दिवसात याचा निर्णय घ्या की माझ्या शहराची महापालिका आहे. माझ्या शहराचा सगळा मतदार संघ आहे तो, माझ्या मतदार संघाच्या विकासकामांवर याचा परिणाम होतो. वर्षभरानंतर जाग येईल आणि त्याच्यानंतर म्हणाल की थांबा साध्य होईल सगळ काय होणार आहे. या गोष्टीला काही अर्थ आहे का? उगाच कुणाची वकीली करायची आणि त्या वकीली करून या शहराच वाटोळ करतोय आपण याला काही अर्थ नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- मी वकीली करत नाही. माझ्या भारतीय जनता पार्टीचे ते नेते आहेत. आमच्या पक्षाचे आमदार आहेत.

**श्री.राजेंद्र पाटील** :- नितीनभाऊ हे वाक्य बोलायचे नाही आहे. वकीली करत नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आहेत. मी जे सुरू आहे जे पाठपुरावा करत आहेत. त्यांनीही बाजु मांडलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- या गोष्टींना काही अर्थ आहे का की चिंता करू नका मी लक्षवेधी लावतोय अस नाही आणि आमदार कसा असावा माहिती आहे का? की मंत्रालयात तो कळकळतो.

**श्री.अनंत जोशी** :- भाऊ विधानसभेची निवडणुक कशी लढणार.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ज्यांचा मतदार संघ आहे त्यांनी त्या शहराचा उध्दार करायला पाहीजे.

**श्री.अनंत जोशी** :- एक मिनिंट विशालभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- समस्यांचे निराकरण करायला पाहीजे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बरोबर आहे नितीनभाऊ

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी** :- ऑगस्टमध्ये विशालभाऊ

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा** :- निकाल लागुन जाईल का लक्षवेधी लावुन जिथे दिवे लावायला पाहीजे तिथे दिवे लावायला पाहीजे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- अस नाहीये भाऊ

**श्री.अनंत जोशी** :- जे जे सामिल आहेत त्यांनी याच्यावर तातडीने तोडगा काढला पाहीजे होता आणि हा निर्णयही काढला पाहीजे होता. मला सांगा की आपल्या महापालिकेची मुदत संपणार आहे आणि हे आता होत आहे सगळ, पुढच्यावर्षी विधानसभेच्या निवडणुका आहेत हे आता होत आहे सगळ ५ वर्षात का नाही केल आणि निधी निधी करतात तर त्याच्यामध्ये जे सामिल आहेत त्यांनी तातडीने त्याच्यावर तोडगा काढायला पाहीजे होता. आता निवडणुका

महापालिकेच्या आहेत. विधानसभेच्या आहेत. तुम्ही करून आणाल आणि पेपरला फोटो छापुन आणणार याला काय अर्थ आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बंटीभाऊ

**श्री.अनंत जोशी** :- त्यांना वाढल तर तो माणुस याच्यासाठी झटेल.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बंटीभाऊ हो ना

**श्री.अनंत जोशी** :- ज्याला आत्मियता असेल ना तो माणुस झटेल.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बंटीभाऊ गेल्या अडीच वर्षामध्ये शिवसेनेचे सरकार होत मग आपण शिवसेनेचे होते. पालकमंत्री शिवसेनेचे होते. आपण काय केल ते सांगा.

**श्री.अनंत जोशी** :- विशालभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- विशालजी लक्षवेधीचा विषय कोणी काढला

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- गाळयांचा विषय आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- विशालभाऊ विषय काय होता.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- मी फक्त गाळयांचा विषय बोललो, मी फक्त गाळयांविषयी बोललो आहे.

**श्री.मनोज चौधरी** :- शब्द मागे घ्या. शब्द मागे घ्या.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी** :- आणि अडीच वर्ष जर सरकार होते तेवढच बोललोय

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत **नाही.)**

**श्री.मनोज चौधरी** :- विशालभाऊ तुम्ही जे बोलता आहे ना ते चुकीच बोलता आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- मनोजभाऊ मी गाळ्यांचा विषय केला.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे सभागृहातील चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ या सभागृहामध्ये ठामपणे या गाळयांच्या विषयी तुम्ही मुळ मलीदा घेतला. गेल्या दोन टर्म पासुन तुमच्या पक्षाने मुगगीळाची भुमिका घेतली आहे. जी भुमिका घ्यायची होती ती आम्ही घेतलेली आहे. तुम्ही भुमिका घ्यायला घाबरता कारण का की तुम्ही राजकारण केले आणि शहराची वाताहात केली. याच्याबद्दल आम्हाला कोणी बोलले का? ते काय बोलले त्यांची बाजुच खरी आहे का आम्हाला पण आहे बाजु आहे. तुम्ही येतात का या निर्णयावर नाही येत.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- बंटीभाऊ सभागृहासाठी अधिकृत पत्र आहे.

**श्री.अनंत जोशी** :- आता ते राजुभाऊ काय बोलले

**श्री.नितीन लढ्ढा** :- दोन मिनिंट, विशालजी, गाळयांच्या बाबतीत महापौरताई , सगळयात जास्त नुकसान व्यापाऱ्यांच जर कोणी केल असेल त्यावेळेला भारतीय जनता पक्षाचे सरकार होत आणि त्यावेळेला एकनाथरावजी खडसे हे मंत्री महोदय होते. गुरूमुख जगवानी हे विधान परिषद सदस्य होते. यांनी या गाळेधारकांची दिशाभुल करून , जळगांव शहर महानगरपालिकेत मी त्यावेळेला मी गटनेता होतो. राजु अडवाणी स्थायी समिती सभापती होते. गाळेधारकांना ९९ वर्षाचा करार त्यावेळेच्या रेडीरेकनरच्या दरामध्ये नाममात्र भाडे १ रूपया चौ. मिटरचे भाडे अशा पध्दतीने देण्याच्या संदर्भातील प्रस्ताव आयुक्त प्रकाश बोखड होते. नगरविकास सचिव मनोजकुमार श्रीवास्तव होते. त्यांच्या मान्यतेने सभागृहासमोर प्रस्ताव आलेला होता. त्यावेळेला या संपुर्ण गाळेधारकांची दिशाभुल करून त्यांना आश्वासन दिले कि गाळे तुम्हाला मोफतमध्ये देवू. तुमच्या मालकी हक्काने तुम्हाला देवु अशा पध्दतीने दिशाभुल करून या महापालिकेच जे काही झालेले आहे ते त्या काळात झालेले आहे. ते का तर त्यावेळेला हुडकोचे १०३ कोटी रूपये आपल्याला देणे होते आणि हुडकोच्या अधिकाऱ्यांसोबत मनोजकुमार श्रीवास्तव साहेब, प्रकाश बोखड साहेब आणि हुडकोचे अधिकारी यांची संयुक्तिक बैठक झाली होती की हुडकोचे १०३ कोटी रूपयांच्या मोबदल्यात वन टाईम सेटलमेंट केल. तर साधारणत ७० ते ८० कोटी रूपयांमध्ये वन टाईम सेटलमेंट साठी प्रस्ताव दिला होता हुडकोने आणि म्हणुन श्रीवास्तव साहेबांनी बोखड साहेबांना सांगीतल की बोखड साहेब आपण महानगरपालिकेच्या माध्यमातुन ७० ते ८० कोटी रूपयांची तरतूद करावी जेणेकरून हा विषय आणि त्याला हमी पण दिली होती राज्य शासनाची , बोखड साहेबांनी ज्यावेळेला हा प्रस्ताव आणला येथे की ७० ते ८० कोटी रूपयांमध्ये वन टाईम सेटलमेंट होईल. मग वन टाईम सेटलमेंट करायच तर महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये ७० ते ८० कोटी रूपयांची तरतूद नव्हती आणि ती तरतूद या

मुदत संपलेल्या मार्केटच्या गाळेधारकांकडून त्यावेळेच्या रेडीरेकनरच्या रेटने साधारणत पाच पाच , सहा सहा लाख रूपये एका गाळेधारकाला तो गाळा मिळाला असता आणि महानगरपालिकेला साधारणत ११० कोटी रूपयांच उत्पन्न त्याच्यातुन प्राप्त होणार होत. ११० कोटी रूपये उत्पन्न प्राप्त झाल असत. तर ७० कोटी रूपये हुडकोचे भरले गेले असते. तिस चाळीस कोटी रूपये राहीले असते ते जेडीसीसी बँक सुध्दा क्लिअर झाली असती. परंतू तत्कालीन नेत्यांना हे मान्य नव्हत की महानगरपालिका कर्जातुन बाहेर नको यायला पाहीजे. कारण हि २०१२ ची गोष्ट होती आणि २०१३ पुन्हा सार्वत्रिक निवडणुका होत्या आणि २०१३ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये हि महानगरपालिका कर्जमुक्त झालेली असेल तर निश्चित आपल्याला या महानगरपालिकेमध्ये शिरकाव करण्याचा योग येणार नाही हा दुष्ट हेतू ठेवुन त्यावेळेला या संपुर्ण मार्केटच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये सामान्य गाळेधारकांची दिशाभुल केली सगळयात जास्त दोषी कोण असेल तर त्या वेळेला भारतीय जनता पक्षाचे असलेले पदाधिकारी.

**श्री.अनंत जोशी :-** आणखी याच्यामध्ये ॲडीशन करतो म्हणजे सर्वांना माहित आहे नविन काही बोलत नाही मी. त्या गाळेधारकांची जसे भाऊंनी सांगितले सगळयात जास्त दिशाभुल जर केलेली असेल तर या तिन लोकांनी केलेली आहे. नाथाभाऊ, गुरमुखसेठ आणि राजुमामा, फक्त राजकारण म्हणुन केलेली आहे. इलेक्शनसाठी केलेली आहे. आणखी एक सांगतो, त्यांना काहीच मार्केट बद्दल घेणेदेणे नाही. फुले मार्केट मधील व्यापारी माझे बांधव आहे, आपले सगळयांचे बांधव आहे. माझा ११-बी गाळा फुले मार्केट मध्ये आहे. तरी सुध्दा मी सांगतो, त्या फुले मार्केटच्या लोकांना खुश करण्यासाठी या लोकांनी केलेले काम आणि त्यामुळे जे गरीब मार्केटवाले होते बिचारे, भास्कर मार्केट, भोईटे मार्केट ते सगळे मेलेले आहे, आंबेडकर मार्केट ते सगळे मेलेले आहे. त्या फुले मार्केटच्या नादात सगळे मार्केट संपलेले आहे. सगळयांना त्रास होत आहे. आणि या सगळयांना कारणीभुत फक्त हे तिनच लोकं आहे. आणि आज हे होऊन ४-५ वर्ष झाले असते, त्यावेळेस हे सगळे घडले असते, जे नितीनभाऊ बोलले ते. ४ ते ५ वर्ष झाले गाळयांची तिच स्थिती आहे. याचा तुम्ही विचार करणार की नाही करणार की, फक्त राजकारण म्हणुन करु.

विशाल त्रिपाठी :- हे जे तुम्ही बोलले ना, भास्कर मार्केट, भोईटे मार्केट त्यांच्यासाठीच ही स्थगिती आहे. त्याच्यासाठी ही स्थगिती दिली शासनाने. डॉ.शांतारामदादा सोनवणे असतील, बंडुदादा असतील, ते स्वत: पाठपुरावा करत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** अहो विशालभाऊ, शांतारामदादा सोनवणे, भगतभाई बालाणी हे सर्व मिळुन मी त्यास साक्षी आहे. येथे तुम्ही जे म्हणत आहे ना. मार्केटचे जप्तीचे आदेश आले होते. तेव्हा तुम्ही म्हणत आहात पालकमंत्र्यांनी काय केलेले मी सांगतो, पालकमंत्र्यांनी वर्षभराची मुदत देऊन दिली होती. तुम्हाला माहिती नसेल तर माहिती घ्या. पण असे पालकमंत्र्यांवर आरोप लावु नका. मी साक्षीदार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझे आरोपाचा विषय नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही सांगितले ना की, पालकमंत्र्यांनी काय केले म्हणुन मी तुम्हाला सांगत आहे. ६५ कोटी मध्ये माझ्या प्रभागातील वार्डातील नगरसेवक असेल, ते हेड ऑफिसला गेले, त्यांना १ कोटी ६० लक्षाचा निधी मिळाला, गुलाबभाऊंनी हे नाही बघितले की, भाजपाचा नगरसेवक आहे की, सेनेचा आहे. जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणुन सगळयांना निधी दिला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** निधी दिला मी मान्य करतो, अभिनंदन सुध्दा करतो. मी मान्य करतो, मी मान्य करतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सन्मा.सदस्यांचा गैरसमज झालेला दिसत आहे. विशालभाऊंचे म्हणणे असे होते. ऐका, ऐका दोन मिनीट ऐका. फक्त गाळयांचा विषय आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** गाळेधारकांचा काय विषय आहे मला माहित आहे ना. १ वर्षाची मुदत घेऊन दिली होती.

**श्री.राजेंद्र पाटील :-** विशालभाऊंचे म्हणणे फक्त ऐवढे होते की, राज्यात सरकार आपले होते. आणि महापालिकेत सुध्दा शिवसेनेचेच सरकार होते, गाळयांचा विषय मार्गी लागुन गेला असता त्या वेळेस.

**श्री.मनोज चौधरी :-** त्यांच्यामुळे मुदत मिळाली ना. डॉ.शांतारामदादा सोनवणे, भगतभाई बालाणी हे गेले होते त्यांच्यामुळे मुदत मिळाली होती.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे जे गाळयांमध्ये राजकारण चालु आहे ना. गाळयांसाठी पण मुदत वाढुन दिल्या आणि हा जो भरगोस निधी देत आहे ना. त्याला कारण पण हेच आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** देत आहे ना निधी आम्ही कुठे नाही म्हणतो.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** एक प्लॉट साफ करायचा आहे, एक जे.सी.बी. सांगितले, तर आपले अधिकारी सांगतात, तो खाजगी प्लॉट आहे आम्ही काम नाही करु शकत. मग कुठल्या तोंडाने तुम्ही खुला भुखंड त्यांच्याकडुन घेतात. तुम्हाला नागरीक खुला भुखंड का भरतील. तुम्ही काय सांगणार लोकांना.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे. भाजपाच्या नगरसेवक काय बोलले विशालभाऊ.

**श्री.मनोज चौधरी :-** विशालभाऊ म्हणत होते, पालकमंत्र्यांनी काय केले.

**श्री.कैलास सोनवणे :-** असे बोलणार नाही विशाल.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी काय बोललो ते सांगतो ना. गाळयांचा विषय सुरु झाला, गाळयांची चर्चा सुरु असतांना विषय असा झाला. अडीच वर्षामध्ये, व यांचे म्हणणे आहे आता तुमचे सरकार होते. म्हटले सगळयात पहिले कायद्यात बदल देवेंद्रभाऊंनी करुन दिला. गाळयांच्या संदर्भात. एतिहासिक विषय घेतला, त्याच्यानंतर स्टे आला त्याच्यावरती, तर देवेंद्रभाऊंनीच सभागृहात मागणी केली, एकनाथभाऊ शिंदे, नगरविकास मंत्री होते, त्यांनी स्टे दिला, विरोधीपक्ष नेते असतांना, तर तुम्ही निर्णय उशिरा घेतला पक्ष म्हणुन हे ते चालु होते त्यांचे, माझे एकच म्हणणे होते की, अडीच वर्षात महापौर पण शिवसेनेचे होते, सरकार शिवसेनेचे होते. त्या वेळेस आपण का करुन घेतला नाही हा विषय. असा माझा मुद्दा होता. पालकमंत्री पण शिवसेनेचे होते त्यावेळेस,

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे चर्चेचा स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मनोजभाऊ, गुलाबभाऊ बद्दल बोलत आहे बिल्कुल कबुल आहे, हे खरे कार्यकर्ते आहे त्यांचे.

**श्री.मनोज चौधरी :-** आहेच ना आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आहेच ना मी कुठे नाही म्हणत आहे. मीच म्हणत आहे ना की, तुम्ही त्यांचे कार्यकर्ते आहे. पण मी काय म्हणत आहे आपण काही गिरीषभाऊ आणि पालकमंत्री हे करु नका. ते केव्हाही एक होऊन जातात. तुम्हाला माहित नाही ते. म्हणुन आपण चहा पेक्षा किटली गरम होऊ नये. केव्हाही एक होऊन जातात ते.

**श्री.मनोज चौधरी :-** आप्पा येथे चहा किटलीचा विषयच नाही. विषय हे होता की, पालकमंत्र्यांनी काय केले. म्हणुन मी विशालभाऊंना बोललो, तसा विषय नाही. आणि आपली युती आहे आप्पा. आपली युती आहे ना आपल्याला मान्य करावे लागेल ते.

**श्री.अंनत जोशी :-** आप्पा ज्या विषयावरुन वाद सुरु झाला ना त्याला चालना देणारे तुम्ही आहात. वादाला नाही त्या विषयाला,व्यापारी संकुलाचा जो विषय होता त्याला चालना देणारे तुम्ही आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कबुल आहे. छातीठोकपणे सांगतो, कबुल आहे, पण त्याचे फळ तुम्हाला केव्हा ना केव्हा भेटणारच आहे. जळगांव महापालिकेला,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि छातीठोकपणे आता हे सांगा की, या विषयाची वाट कोणी लावली.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांची वाट लागत आहे आता, त्या विषयाची जास्त वाट लावणाऱ्यांची वाट लागत आहे आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभागृहाला समजणार आहे आता. समजदार को ईशारा काफी है.

**श्री.कैलास सोनवणे :-** माझ्या मनामध्ये नाव वेगळे आहे तुमच्या मनामध्ये नाव वेगळे आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आम्ही सगळं समजुन घेऊ तुमच्या मनाप्रमाणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** माझ्या मनामध्ये नाव वेगळे आहे तुमच्या मनामध्ये नाव वेगळे आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आणखी एक विषय आहे. एक शेवटचा विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** जळगांवची वाट कोणी लावली आणि कशासाठी लावली. जळगांवला पैसे मिळु नये. या जळगांवला निधी येऊ नये. या जळगांवचे नागरीक खड्डयात जावे. हे ज्यांनी केले त्यांची वाट लागत आहे. हे पहा, तुम्ही जर बांबुळचे बिज पेरले तर गुलाबजामुन उगणार नाही. बांबुळच उगणार आहे त्याला. काटयांचेच झाडे उगणार आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा एका याच्यातच संपवतो. व्यापाऱ्यांची तळमळ आहे ज्या काही लोकांना, हे जे काही म्हणत आहे तुम्ही. त्यांना जी व्यापारींची तळमळ आहे. ऑफ दि रेकॉर्ड ऐकुन ऐकुन सांगतो मी. ७ कोटी रुपये त्या व्यापाऱ्यांकडुन जमा केले होते. त्यांचा हिशोब त्या व्यापाऱ्यांना द्या मागत आहे ते बिचारे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** गाळे नुकसान भरपाईबाबत प्रशासनाने याच्यामध्ये ८१ कोटीची तरतुद केलेली आहे. ती टोटल १०१ कोटीची तरतुद करण्यात यावी. जेणे करुन दोन तीन महिने सहा महिन्यात जेव्हा हा विषय मार्गी लागेल, आपल्याला पैसे मिळणार आहे. उत्पन्न मिळणार आहे. ते काही सुटणार नाही. तर ती तरतुद करण्यात यावी हा जमा बाजुचा विषय सांगितला मी,खर्च बाजु जो आहे, खर्च बाजुमध्ये जे सगळयात जसे नितीनभाऊ बोलले की, ८ कोटी रुपये प्रशासनाने नविन जमिनींसाठी तरतुद केलेली आहे. या शहरामध्ये आपण जर बघितले तर १०० कोटीचे रस्ते अजुनही कॉलन्यांमधील बाकी आहे. आता आपले बरेच ६०-७०% मुख्य रस्ते झालेले आहे. कॉलन्यातले बरेच रस्ते झालेले नाही अनेक वर्षापासुन. जसे मनोजभाऊंनी ही रस्त्याचा एक विषय मांडलेला आहे. नविन रस्त्यांसाठी २० कोटीची अजुन तरतुद करण्यात यावी. त्याच्यानंतर नविन गटारीचा पण विषय मोठा आहे. नविन भागांमध्ये नविन गटारी नाही. प्रशासनाने ३ कोटी नविन गटारींसाठी ठेवलेले आहे. तर ७ कोटी त्याच्यात वाढ करण्यात यावी. १० कोटीची वाढ नविन गटारीसाठी करण्यात यावे. त्यानंतर रस्ते व्यवस्था व दुरुस्ती, आणि गटार व्यवस्था व दुरुस्ती हा जो भाग आहे, हा जो जुना भाग आहे सगळा, म्हणजे मेहरुण गावठान असेल, पिंप्राळा गावठान असेल, किंवा हा जळगांवचा जो मध्येवर्ती भाग आहे. तेथे नविन गटारी बनु शकत नाही पण गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठी जी तरतुद आपण या ठिकाणी केलेली आहे. २ कोटीची आहे. याच्यामध्ये ३ कोटी अजुन वाढ करण्यात यावी. कारण जसे नितीनभाऊंनी सांगितले की, नविपेठेची एक गटार खोदली की, १ कोटी सहज लागुन जातात किंवा तिला रिपेअर करायचे म्हटले तर, रस्ते व्यवस्था व दुरुस्तीसाठी ३ कोटी ठेवलेली आहे, ती २ कोटी अजुन वाढविण्यात यावी. कारण अजुन ही काही रस्ते इस्टीमेट वगैरे होतांना उशीर होऊ शकतो, तोपर्यंत दुरुस्तीमध्ये आपण आपल्या महापालिकेच्या माध्यमातुन दुरुस्ती करत असतो. त्याच्यानंतर बगिचे सुशोभिकरणचा जो हेड आहे आपला, त्याच्यामध्ये १ हजार रुपयांची तरतुद ठेवलेले आहे फक्त ती २५ लक्ष करण्यात यावी. स्मशानभुमी व्यवस्था व दुरुस्ती येथे १० लाख रुपयेच ठेवले आपण, पण आपल्याला आता पिंप्राळयाची स्मशानभुमी असेल, मेहरुणची असेल त्यांचीही अवस्था दयनिय आहे. तर त्या ठिकाणी १० लाख वाढ करण्यात यावी. पण स्मशानभुमी व इतर सार्वजनिक व्यवस्था व दुरुस्ती त्याच्यात पण १० लाखाची वाढ करण्यात यावी. व्यापारी संकुल, आता व्यापारी संकुलाचा आपला प्रश्न समजा मार्गी लागणार आहे. तर त्या हिशोबाने त्याची दुरुस्ती पण आवश्यक आहे. त्याची पण अवस्था खुप खराब आहे. त्याचे जिने तुटलेले असतील, त्याच्यामध्ये २५ लक्ष आपण तरतुद ठेवलेली आहे. तर ५ कोटी त्या ठिकाणी तरतुद करण्यात यावी. जसे गोलाणी मार्केट ते लोकं आपल्याला भरणा देत आहे. त्यांचाही भरणा रेग्युलर सुरु आहे. पण आपण सुविधा त्या ठिकाणी त्यांना देऊ शकत नाही. हा एक महत्वाचा विषय आहे. सगळयात महत्वाचा विषय, आपण जो नगरसेवक निधी ठेवललेला आहे. तो एकुण उत्पन्नाच्या २ टक्के हिशोबाने एका नगरसेवकाला ३.५ लक्ष रुपये.आपण तरतुद केलेली आहे. आणि नविन हेड निर्माण करुन नगरसेवकांसाठीच प्रभाग विकास निधी म्हणुन आपण ते हेड ठेवलेले आहे आणि त्याच्यात ६.५ लाखाची तरतुद ठेवलेली आहे. तसी त्याच्यामध्ये एकुण नगरसेवकाला १० लाख रुपयेच मिळत आहे. ते खुप कमी आहे. १० लाख रुपये, तर त्याच्यात वाढ करुन प्रत्येकी नगरसेवक याला २५ लाख रुपये प्रमाणे नगरसेवक निधी मंजुर करण्यात यावा. काम १० चे झाले तरी चालेल नितीनभाऊ. पण २५ लाख मंजुरी झाली पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम ५० कर लो ना यार. मिलने पे इमपॅटन्स है.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रत्येक नगरसेवकांना, यामध्ये प्रभाग विकास निधी नावाने जरी असला, तरी प्रत्येक नगरसेवकाच्या नावाने एक फॉरमेट करुन घ्या. हिशोब ठेवा त्या नगरसेवकाचा, जसे आमदारांचे असते, तुमची तरतुद संपलेली आहे. इतकी बाकी आहे. हा पायंडा नितीनभाऊ ४ महिने जाऊ द्या पण पुढील येणाऱ्या नगरसेवकांसाठी पण हा महत्वाचा राहील. हा जो आपण बाकीच्या लोकांना त्रास झाला, तो त्यांना तरी होऊ नये. ही माझी सभागृहास विनंती आहे.

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ, एकच मिनीट हे काय आहे मागच्या मिटींगलाही चर्चा झाली होती. पेपराला बातमी आली, आता नागरीक विचारायला येतात, तुम्हाला निधी मिळत आहे मग.मिळणार की नाही. नागरीकांना वाटते की, आपल्याला पैसे मिळाले म्हणुन. विचारायला येतात लोकं तुम्हाला किती निधी मिळणार आहे भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे मी सर्व देत आहे लेखी स्वरुपात,

**मा.आयुक्त :-** द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** धन्यवाद.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, पुनश्च एकदा या आर्थिक वर्षात सुध्दा आपण स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महासभेत मांडणी करण्यासाठी आहोत.अत्यंत खेदाची बाब आहे. मला फक्त एकच नविन हेड आपल्या बजेटमध्ये ॲड करायलासुचवायचे आहे. काही मोठया महापालिकेंचा जेव्हा आपण अभ्यास करतो.त्यावेळेला काही गोष्टी आपल्या लक्षात येतात.आपले ॲसेटस जे असतात ते अत्यंत महत्वपुर्ण असतात. या संदर्भातली माझी एक सुचना आहे. प्रशासनाने नमुद करुन घ्यायची आहे. आणि त्यानुसार या हेडची एन्ट्री घ्यायची आहे. महानगरपालिका मालकीच्या ज्या मालमत्ता आहे. त्या मालमत्तांचे व्हॅल्युवेशन ठरविण्याकामी आपण नव्याने हेड निर्माण करुन मालमत्ता व्यवस्थापन हा विभाग व्हॅल्युवेशन संदर्भात आऊटसोर्स करावा. आणि यासाठी एक कोटीची तरतुद आपण करण्यात यावी. याची मागणी करत आहे याच्या मागचे कारण मी आपल्याला सांगते. मागे जेव्हा आपल्याकडे कपील पवार साहेब होते मुख्यलेखापरिक्षक म्हणुन त्यावेळेला सुध्दा हा एक चर्चेचा भाग म्हणुन हा मुद्दा आमचा झालेला होता की, आपल्या मालमत्तांचे व्हॅल्युवेशनच आपल्याकडे नाही. मुळात सुरुवात येथुन आहे की, आपल्याकडे आपल्या मालमत्तांची प्रॉपर नोंदच नाही. आपल्याकडे दुहेरी नोंद जी घेतली जाते. तर त्या डबल एन्ट्री मध्ये एक एन्ट्री असते की, ज्यात आपल्याला आपल्या मालमत्तांच व्हॅल्युवेशन नमुद करायचे असते. पण आपल्याकडे कोणतीही तांत्रिक यंत्रणा या कामी नाही. त्यामुळे आपण त्याचे व्हॅल्युवेशन एक्सॅक्ट देऊ शकत नाही. आपण ते काही तरी मोघम देतो. जेव्हा आपण दुसऱ्या महापालिकेंचा अभ्यास करणार. जसे जेव्हा आपण पुणे महापालिकेचे उदाहरण घेतले, पुणे मध्ये जे RPO त्यांनी सुरु केले. तर यामध्ये विषय असा असतो. आयुक्त महोदया आणि महापौरताई, आता सद्या आपण १५ व्या वित्त आयोगापर्यंत आलो. पण १६ वा, १७ वा वित्त आयोग त्यांची जेव्हा आपल्याकडे येण्याची वेळ येईल. त्यावेळेला अनेक निधी ज्या आपल्याला अलॅट होत असतात. अनेक शासकीय निधी जे वेगवेगळे येत असतात. ते तुमच्या मालमत्तांच्या ॲसेटसवर सुध्दा अवलंबुन असतात. हे जळगांव महापालिका म्हणुन पुढचा व्हिजन आहे. त्या कामी आपली ही पहिली पायरी असणार आहे की, मालमत्तांचे आपले व्हॅल्युवेशन झाले पाहिजे. आजची आपली परिस्थिती अशी आहे. आपला जो रेशो आहे कर्मचारी सेवानिवृत्तीचा, त्यामुळे आपल्याकडे जे कर्मचारी माहितगार होते. ज्यांना महापालिकेच्या मालमत्ता किंवा लोकप्रतिनिधी सुध्दा ते बदलत असणार आहे. पुढच्या पाच वर्षात किती येथे रिपीट होती, किती जुने राहतील याच्या बद्दल कोणीही सांगु शकत नाही. तर भविष्यात या कामी कोणीही असणार नाही. योग्य ऑथेन्टीक माहिती देणारे. आपल्याकडे कोणत्याही नोंदी नाही.या सगळया नोंदी झाल्या पाहिजे. रेकॉर्डवर आल्या पाहिजे जेणे करुन आपल्याच महानगरपालिकेच्या उन्नतीसाठी पुढे कामात येणार आहे. त्यामुळे या गोष्टी नोंदवुन घ्याव्या. आणि हे एक हेड मालमत्ता व्हॅल्युवेशन, मालमत्ता शोधणे, ते शोधण्याचे काम ही आपण आऊटसोर्स करु शकतो. ज्या काही अस्तीत्वात आहे त्यांच्याकडुन ही आपण करुन घेऊ शकतो. आणि व्हॅल्युवेशन कामी सुध्दा आऊटसोर्सींग तर या कामी १ कोटीची डिमांड असावी असे मला वाटते. ऐवढेच एक हेड वाढवुन तरतुद करुन घ्यावी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पुतळा उभारणे कामी तरतुद केलेली आहे २ कोटी तर ती ५ कोटी करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. कारण पिंप्राळयाचा एक विषय आहे, शिवाजीनगरचा आहे. ह्या ज्या गोष्टी प्रस्तावीत करणार त्या वेळेस निधीची अडचण येऊ नये. म्हणुन ते ५ कोटी करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** आता सरदार वल्लभभाई पटेलांचा पुतळा बसविणे प्रस्तावीत आहे. भाऊ मागच्या वेळेस आपल्याकडे तरतुद नव्हती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण बोलले त्या संदर्भातीलच तरतुद आहे ही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एकच पुतळा १ कोटीचा आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दोन यांचे दोन त्यांचे भाऊ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग त्याचे सुशोभिकरण आहे, भरपुर गोष्टी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इमारत व्यवस्था व दुरूस्ती मध्ये येईल ते. ठिक आहे तरतुद वाढवुन घेऊ. त्याच्या बद्दल काही वाद नाही.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदया, आयुक्त महोदया, सन्मा.सभागृह, खरं तर आजचा बजेट पाहत असतांना किंवा ज्या सदस्यांनी या ठिकाणी चर्चा केली. खरं तर याच्यामध्ये सर्वात महत्वाची बाब ही आहे की, या बजेटमध्ये, अर्थसंकल्पामध्ये, कर्जफेड आणि थकीत देणे हे आज रोजी या ठिकाणी शुन्य दिसत आहे. ही खुप मोठी बाब आहे. कारण गेल्या काळामध्ये आपण वर्षानुवर्ष ही महापालिका कर्जाच्या ओझा खाली होती. आणि बँकेंचे असतील किंवा प्राधिकरणाचे आपल्याला जे पैसे भरावे लागत होते. खरं तर पुढच्या काळामध्ये आपल्याला ते पैसे भरायचे नाही व जे पैसे उरणार आहे. त्याच्या मधुन आपल्याला विविध विकास काम हे येणाऱ्या काळामध्ये करता येणार आहे. या ठिकाणी नितीनभाऊ बोलले असेल, कैलास आप्पांनी बोलले असेल, विशालभाऊंनी बोलले असेल, शुचितातांईनी असेल, ज्या ठिकाणी ज्या ज्या काही सुचना मांडल्या. किंवा जे हेड व्यक्त केले, खरं तर जसे या ठिकाणी विशालभाऊंनी, नितीनभाऊंनी सांगितले, आपण तरतुदी करत असतांना त्या तरतुदींची उद्दिष्ट पुर्ण झाली पाहिजे.हे प्रशासनाचे काम आहे. आपण जर तसे बघायला गेले तर आपण वास्तविक उत्पन्नाबद्दल, आता भाऊंनी सांगितले, जे आपण या ठिकाणी ४८% वसुली पर्यंतच आपण व आपले कर्मचारी पोहचलेले आहे. मला असे वाटते येणाऱ्या काळामध्ये आपली जी वसुली आहे ही ६० ते ६५% पर्यंत जर गेली. तर मला असे वाटते या ठिकाणी ज्या सदस्यांनी सुचविलेल्या तरतुदी आहे येणाऱ्या काळात पुर्ण करता येतील. खरं तर जळगांव शहरामध्ये विकास कामांचे अनुशेष आहे. परंतु गेल्या काळात राज्यामध्ये शिवसेनेचे सरकार होते. महाविकास आघाडीचे सरकार होते. उध्दव सर ज्या वेळेस मुख्यमंत्री होते. आदरणीय एकनाथ शिंदे साहेब नगरविकास मंत्री होते. त्यावेळेस जळगांव शहर महानगरपालिकेला व राजुमामा आमदार होते. यांच्या सर्वांच्या माध्यमातुन जळगांव शहराला खुप निधी यांनी प्राप्त करुन दिला. त्यावेळेस महापौर असतील, नितीनभाऊ असतील, या ठिकाणचे सर्व जेष्ठ सदस्य असतील.यांनी त्यांचे त्यांचे प्रयत्न करुन शासनाकडुन निधी उपलब्ध करुन घेतले, खरं तर महानगरपालिका फंडातुन आपण आयुक्त पदावर विराजमान झाल्यापासुन देखील जळगांव शहरामध्ये महानगरपालिका फंडातुन देखील बरेच कामे या ठिकाणी करण्यात आली. परंतु येणाऱ्या काळात सुध्दा आमची विनंती असेल सभागृहाच्या वतीने की, आपण आपले जे थकबाकीदार असतील किंवा आता जसे भाऊंनी सांगितले, आपण शास्ती माफ करतो आणि शास्ती माफ करुन आपण जवळपास ९ कोटी रुपये. आपण ते ओढले ९ कोटी रुपये. मला असे वाटते की, जे ९ कोटी रुपये तुम्ही सांगितले भाऊ शास्तीच्या माध्यमातुन माफ करणे ते आपले नुकसान आहे. पण आपण एका बाजुने जर विचार केला तर जो थकबाकीदार आहे. त्यांना आपण ती शास्तीच्या माध्यमातुन दिलेली माफी जी असते ती आपण त्यांना एक सहानुभुती म्हणुन देत असतो. आणि ती शास्ती म्हणुन देत असल्याकारणाने अभय योजना जी राबवली, आपण ती राबवत असतांना आपण जर बघितले असेल, आपल्या वसुली जमा मध्ये बऱ्यापैकी फरक पडलेला दिसत आहे. कारण बऱ्याच वर्षापासुन आपले जे घरकुल धारक आहे यांच्याकडे आपण वसुलीसाठी तकादा लावतो. पण त्याच्यामध्ये या ठिकाणी आपल्याला काही यश प्राप्त होत नाही. आणि आपण सर्व सारखे सर्वपक्षीय मिटींग घेत असतील,सर्व गटनेत्यांची मिटींग होत असतील, सभागृहात महासभेमध्ये ही चर्चा होते. परंतु त्या ठिकाणी वसुली करणेबाबत महापालिका प्रशासन हे फेल ठरलेले आहे. मला असे वाटते, त्या दृष्टीने देखील येणाऱ्या काळामध्ये या ठिकाणी महानगरपालिका प्रशासनाने काम केले पाहिजे जेणे करुन आपल्याला आपल्या जमा बाजुमध्ये पैसे जमा होऊन विकास कामे करता येतील. राहिला विषय या ठिकाणी बजेटमध्ये तरतुदी करण्याचा. महानगरपालिका प्रशासनाने या ठिकाणी जो बजेट दिलेला आहे. त्याच्यामध्ये पुतळे व्यवस्था व दुरूस्तीसाठी असेल, रस्त्यांसाठी असेल, गटारींसाठी असेल जे काही बदल सुचवलेले आहे, ते प्रशासनाने नमुद केले पाहिजे. त्याच बरोबर मी या ठिकाणी सांगु ईच्छितो की, मेहरुण भाग असेल, पिंप्राळा भाग असेल, खेडी भाग असेल, हे ग्रामीण भाग आहे या ठिकाणी शेतकरी वर्ग राहतो. व यांच्याकडे गुरेढोरे आहेत. तर त्या ठिकाणी गुरेढोरांचे पाणी पिण्याची व्यवस्थेसाठी डाव तयार करणेसाठी आपल्याला तिघी भागातुन ईस्टीमेट प्राप्त झालेले आहेत.

परंतु आपल्या लेखाशिर्षामध्ये तशी काही तरतुद किंवा लेखाशिर्षकामध्ये लेखाशिर्षक नसल्याकारणाने व तरतुद नसल्या कारणाने, मला असे वाटते की, ५० लक्ष रुपयांची तरतुद त्या ठिकाणी या लेखाशिर्षकात करायला पाहिजे. त्याच प्रमाणे या ठिकाणी दिक्षाभुमीसाठी सुध्दा तरतुद जी शुन्य आहे ती देखील ५ कोटी करण्यात यावी. जेणे करुन आपले जे सर्व जेष्ठ सदस्य असतील, आमदार असतील, मा.मंत्री महोदय असतील,मुख्यमंत्री असतील यांच्या माध्यमातुन आपण शासनकडुन दिक्षाभुमीसाठी काही न काही निधी प्राप्त करु शकतो. कारण पिंप्राळा भागात आपण दिक्षाभुमीसाठी जागा राखुन ठेवलेली आहे. बऱ्याच वर्षापासुन त्या समाजाची त्या ठिकाणातील लोकांची व नागरीकांची बऱ्याच वर्षापासुन जी मागणी आहे. तेथे दिक्षाभुमी झाली पाहिजे. तर मी या ठिकाणी दिक्षाभुमीसाठी ५ कोटीची तरतुद करुन घ्यावी हे सुचवतो.

**मा.महापौर :-** कोणाला काही बोलायचे आहे.

**नगरसचिव :-** अर्थसंकल्पाच्या सभेमध्ये मा.महापौर महोदया त्यांचे मनोगत व्यक्त करतील.मा.महापौर महोदयांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करावे.

**मा.महापौर :-** मा.आयुक्त, मा.उपमहापौर, मा.नगरसचिव, सर्व सन्मा.नगरसेवक, सर्व सन्मा.अधिकारी व कर्मचारी व सर्व सन्मा.पत्रकार बंधु, महाराष्ट्र महानगरपालिकेतील अधिनियम कलम ९५ अन्वये सन २०२२-२३ चे सुधारीत व सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी महासभेपुढे मंजुरीसाठी सादर केलेले आहे.अधिनियमातील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांनी अर्थसंकल्प हे मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समिती अस्तीत्वात नसल्याने सदर अंदाजपत्रक मा.आयुक्त यांनी दि.२१/०३/२०२३ रोजी विशेष महासभेपुढे सादर केले. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकाचे सन्मा.सदस्यांनी अवलोकन करुन निर्णय घेणेसाठी ही विशेष महासभा तहकुब करण्यात आली.सदरील तहकुब महासभा आज रोजी दि.२९/०३/२०२३ ला घेण्यात येत आहे. सन २०२२-२३ चे सुधारीत आणि सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकाला आपणास आज मान्यता द्यावयाची आहे. जळगांव शहर महानगरपालिकेची स्थापना होऊन २० वर्ष पुर्ण होऊन २१ व्या वर्षात महानगरपालिकेने पदार्पण केलेले आहे. आणि एक विकासाच्या पर्वाला सुरुवात झाली आहे. असे मला वाटते कारण ऐवढी वर्ष कर्जाच्या ओझा खाली दबलेली महापालिका, कर्जमुक्त झालेली आहे.शहरात बऱ्याच ठिकाणी रस्त्यांचे कामे पुर्ण झालेली आहे, काही ठिकाणी सुरु आहे तर काही प्रस्तावीत आहे. अमृत आणि मलनिस्सारण योजना अंतिम टप्यात आहे. प्रशासनाकडुन सदर अंदाजपत्रकात कोणतीही कर वाढ न करता जमा बाजु उगाच फुगवता न करता, आणि परिस्थिती लक्षात घेऊन अर्थसंकल्प महासभेसमोर सादर केलेला आहे. मा.आयुक्त यांचे आभार मानते की, त्यांनी १००% शास्तीची अभय योजना राबवुन थकबाकीदारांना दिलासा दिलेला आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात वसुली होऊन त्याचे उद्दिष्ट पुर्ण होणेस नक्कीच मदत होणार आहे. दुकान आणि गाळेभाडे संदर्भात शासन दरबारी पाठपुरावा तर आपल्याला करावाच लागणार आहे. परंतु व्यापाऱ्यांबरोबर समन्वये आणि सुसंवाद साधुन लवकरात लवकर मार्ग कसा मोकळा करता येईल याचा लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी विचार करावा लागेल. जळगांव शहराचा विचार करता बऱ्याच भागात स्लम वस्ती आहे. त्यांच्यासाठी सुसज्ज व शासकीय योजनांनी परिपुर्ण असे प्रस्तुतीगृह असणे आवश्यक आहे. परंतु त्यासाठी कोणतीही तरतुद अर्थसंकल्पात दिसुन येत नाही. त्यासाठी प्रशासनाने नियोजन करावे.महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीवर स्वउर्जा प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. त्यामुळे विज बिलाची बचत होईल. परंतु त्यासाठी केलेली १ कोटीची तरतुद ही फार तोकडी आहे. त्यामध्ये सुध्दा वाढ करण्यात यावी. असे मला वाटते. सद्या ईलेक्ट्रीक वाहनांचा वापर मोठया प्रमाणात वाढत आहे. त्यासाठी १ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप मधुन ईलेक्ट्रीक चार्जीग स्टेशन उभारता येतील आणि आपली मोठी रक्कम ही वाचवता येईल असे मला वाटते. समाज विकास विभागातील महिला बालकल्याण विभाग, दिव्यांग निधी, आर्थिक व दुरबल घटक यासाठी अंदाजपत्रकात केलेली तरतुद फक्त मानधन देण्यापुरती मर्यादीत न राहता, त्यांचे सर्वांघीण विकास होण्यासाठी लोक सहभाग वाढविला पाहिजे. यासाठी तज्ञ व अनुभवी व्यक्तींचे व संस्थानचे सहकार्य घेतले पाहिजे. यावर्षी मा.आयुक्त यांचे पुढाकाराने होत असलेले खान्देश महोत्सव हे नक्कीच कौतुकास्पद आहे.त्यामुळे बचत गटातील महिलांचे मनोबल वाढवुन सक्षमीकरण होण्यास मदत होईल. प्रथमच अंदाजपत्रकात नगरसेवकांसाठी स्वईच्छा निधी व प्रभाग विकास

निधीचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याबाबत प्रशासनाचे आभार, परंतु खुले भुखंड, उद्याने, सार्वजनिक वाहतुक व्यवस्था सर्व चौकातील सिग्नल यंत्रणा, अतिक्रमण शहराचे विद्रुपीकरण थांबविण्याकरीता उपाययोजना संदर्भात कुठेही विशेष भाष्य दिसुन येत नाही. जळगांव सारखे दुसऱ्या शहरांमध्ये फालके दुभाजक, इत्यादी प्रभावी माध्यमातील उपयोग करुन कोटयावधी रुपयांनी उत्पन्न वाढविले जातील. त्या संदर्भात प्रशासनाने अभ्यास करुन ठोस निर्णय घ्यावा. जळगांव शहरात सुमारे १२ कि.मी.चे रस्ते दुभाजक आहे. त्यावरील वृक्षरोपणाचा बोजबारा उडालेला आहे. त्यालाही लोकसहभागातुन सुशोभित करता येणे शक्य आहे. शहरात लहान मोठे ७८ चौक कॉर्नर आहे. त्यावर फक्त जाहिराती आणि फलकच दिसतात. त्यांच्यावर कठोर कार्यवाही होणे आवश्यक आहे. शहरातील प्रत्येक चौकात राष्ट्रीय सण, उत्सव हे सुशोभित करुन साजरे केले गेलेच पाहिजे.तेही लोकसहभातुनच, जळगांव शहरातील सर्वांगीण प्रगती नियोजनबध्द पध्दतीने नक्कीच होऊ शकते, आपले उद्दिष्ट फक्त कागदावरच न राहता ते कृतीत दिसले पाहिजे. त्यासाठी प्रशासनाने लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे आवश्यक आहे. आपला आकृतीबंध मंजुर होऊन भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झालेला आहे. लवकर भरती प्रक्रिया होऊन प्रशासन नक्कीच गतीमान होईल आणि अंदाजपत्रकातील प्रस्तावीत कामांना मुक्त स्वरुप प्राप्त होऊन जळगांव शहर महापालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतीमाण होईल, असा मला विश्वास आहे. चला तर सर्व सन्मा.पदाधिकारी, सदस्य सर्वांनी समन्वयाने एकत्र येऊन आर्थिक उत्पन्नाची बाजु भक्कम करण्यासाठी उपाययोजना करुन जळगांव शहराच्या विकासासाठी सर्व सामान्यांच्या मुलभुत सोईसुविधा पुरविण्यासाठी आपण सर्व प्रयत्नशील राहु. धन्यवाद.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, दिलेला अर्थसंकल्पाचा अंदाज आणि त्याच्यावरती या सभागृहात झालेली चर्चा आणि त्या अनुषंगाने अर्थसंकल्पामध्ये ज्या काही गोष्टींची कमतरता होती, ते सन्मा.सदस्य श्री. विशालजी त्रिपाठी, ॲड.पोकळे साहेब,शुचिताताई हाडा, मा.महापौरताई, मा.उपमहापौर कुलभुषणभाऊ या सर्वांनी ज्या ज्या काही सुचना सुचविलेल्या आहे. त्या सुचनांचा समावेश करुन उत्पन्न वाढीच्या अनुषंगाने घरपट्टीच्या माध्यमातुन उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोणातुन बदल करणे या सगळया गोष्टींचा योग्य तो ताळमेळ घालुन या अर्थसंकल्पाला ही महासभा मान्यता देत आहे.

**मा.उपमहापौर :-** याला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** ज्या सन्मा.सदस्यांनी अर्थसंकल्पामध्ये बदल किंवा तरतुदींमध्ये बदल करण्याच्या संदर्भात सुचना दिलेल्या आहे. त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी. व त्या पध्दतीने बदल करुन घ्यावे. सर्वानुमते अर्थसंकल्प मंजुर करण्यात येत आहे. या विशेष महासभेचे कामकाज येथे संपलेले आहे. इतिवृत्तात याची नोंद घेण्यात यावी. या पुढील चर्चेची इतिवृत्तात नोंद घेतली जाणार नाही परंतु प्रशासनाला त्या सुचना राहणार आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१०४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका, जळगांव यांचेकडील पत्र क्र./जशमनपा/७०९/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये मा.आयुक्त सो., यांचेकडुन मा.महासभेपुढे सादर होणारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करणेंत आलेले आहेत. दि.२१/०३/२०२३ रोजी सकाळी- ११ वाजता घेण्यात आलेली विशेष महासभा अंदाजपत्रकातील जमा आणि खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अभ्यास करणे तसेच विचार विनिमय करणेसाठी तहकूब करणेत आली होती. सदर तहकूब विशेष महासभा दि.२९/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली. दरम्यानच्या काळात मा.आयुक्त यांनी सादर केलेल्या माहितीचा सर्व सन्मा.म.न.पा.सदस्यांनी सखोल अभ्यास करुन सभागृहात सन्मा.सदस्यांनी अंदाजपत्रकात जमा व खर्च बाजू मधील आकडेवारी संदर्भात केलेली चर्चा व मांडलेल्या सुचनांप्रमाणे जमा व खर्च बाबत सुचविलेल्या दुरुस्ती प्रमाणे सन २०२२-२०२३ चे रक्कम रु.८०२,३३,८३,३५९/- चे सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सन २०२३-२०२४ चे रक्कम रु.९५१,७५,०९,४९९/- चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी यांनी सभागृहात सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चा व सुचनांप्रमाणे अंदाजपत्रकात दुरुस्ती करुन परिपुर्ण अंदाजपत्रकाची प्रत अदयावत करुन सर्व सन्मा.सदस्यांना तसेच सर्व संबंधित विभागांना वितरीत करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर अंदाजपत्रकाच्या छपाईसाठी येणाऱ्या खर्चास सुध्दा याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४६**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**

**(महाजन जयश्री सुनिल)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**